# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२६-२७

## अल्पसंख्याक विकास विभाग

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
२०२६

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२६-२७

# अल्पसंख्याक विकास विभाग

# - अनुक्रमणिका –


| अ.क्र | उप.क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | | सर्वसाधारण प्रस्तावना | |
| २ | | वित्तीय विवरणपत्र | |
| ३ | | अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) बाबत संक्षिप्त माहिती | १ |
| ४ | | कार्यक्रम - | |
| | (१) | सचिवालय सर्वसाधारण सेवा - | ३ |
| | | (अ) अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) | ३ |
| | | (ब) उर्दू साहित्य अकादमी | ५ |
| | | (क) राज्य सांप्रदायिक सदभावना परिषद | ५ |
| | (२) | राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पसंख्याक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना. | १५ |
| | (३) | मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | २८ |
| | (४) | जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | ३४ |
| | (५) | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई | ४० |
| | (६) | महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई | ४५ |
| | (७) | महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर | ५० |
| | (८) | महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधीकरण, छत्रपती संभाजीनगर | ५० |
| | (९) | महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी | ५४ |
| | (१०) | महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी, मुंबई | ५८ |
| | (११) | अल्पसंख्याक आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर | ६२ |
| | (१२) | जिल्हा अल्पसंख्याक कक्ष | ६३ |
| | (१३) | अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षणा संस्था (MRTI) | ६४ |
| | (१४) | संकीर्ण सर्वसाधारण सेवा - | ६८ |
| | | (अ) अल्पसंख्याकाच्या कल्याणासाठी मा.पंतप्रधानांचा नवीन १५ कलमी कार्यक्रम | ६८ |
| | | (ब) राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जाची मान्यता | ६९ |
| | | (क) महाराष्ट्र शासनाचा श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार | ६९ |


*****

# सर्वसाधारण प्रस्तावना

# अल्पसंख्याक विकास विभाग

## मा.मंत्री, अल्पसंख्याक विकास (औकाफसह)

| अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग |
|---|

(१) अल्पसंख्याक विकास विभाग, आस्थापना
(२) अल्पसंख्याक विकास विभाग, रोख शाखा
(३) अल्पसंख्याक विकास विभाग, अर्थसंकल्प
(४) अल्पसंख्याक विकास विभाग, गृहव्यवस्थापन
(५) विधानमंडळ कामकाज
(६) अल्पसंख्याक विकास विभाग, नोंदणी शाखा
(७) अल्पसंख्याक विकास विभाग, रचना व कार्यपध्दती
(९) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर
(१०) महाराष्ट्र राज्य वक्फ वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर
(११) राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा देणे.
(१२) अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजना
(१३) अल्पसंख्याकांसाठी मा.पंतप्रधानांचा नवीन १५ कलमी कार्यक्रमाची अंमजबजावणी
(१४) न्या. सच्चर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी
(१५) राज्य सांप्रदायिक सदभावना परिषद
(१६) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
(१७) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
(१८) जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
(१९) महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
(२०) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई
(२१) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी, मुंबई
(२२) अल्पसंख्याक आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर
(२३) जिल्हा अल्पसंख्याक कक्ष
(२४) अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षणा संस्था (MRTI)

---

## वित्तीय विवरणपत्र / Financial Statement

---

# वित्तीय विवरणपत्र

| अ क्र | कार्यक्रमाचे नांव | | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Budget Estimate २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महसूल Revenue | भांडवली Capital | एकूण Total | महसूल Revenue | भांडवली Capital | एकूण Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सेक्रेटरीएट सर्वसाधारण सेवा (२०५२) | अनिवार्य खर्च | ५९६२५ | ० | ५९६२५ | ९१०९२ | ० | ९१०९२ |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ४०४६ | ० | ४०४६ | १००००० | ० | १००००० |
| २ | राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पसंख्याक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना (२२३५) | अनिवार्य खर्च | १७४९४ | ० | १७४९४ | ३८०५७ | ० | ३८०५७ |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ५७७०५७३ | ० | ५७७०५७३ | ८९६४९९८ | ० | ८९६४९९८ |
| ३ | मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित / राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ (४२३५) | अनिवार्य खर्च | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ० | २५३००० | २५३००० | ० | २५५००० | २५५००० |
| ४ | जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित / राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ (४२२५) | अनिवार्य खर्च | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग (२२३५ A २४९) (२२३५ A २५८) | अनिवार्य खर्च | १०१४१ | ० | १०१४१ | १५०४३ | ० | १५०४३ |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | २१४६६ | ० | २१४६६ | २०००० | ० | २०००० |
| ६ | महाराष्ट्र राज्य हज समिती (२२३५ A २६७) / (२२३५ A २७६) | अनिवार्य खर्च | ७३५३ | ० | ७३५३ | २२८९४ | ० | २२८९४ |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ० | ० | ० | २०००० | ० | २०००० |
| ७ | जिल्हा प्रशासन (महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ/ न्यायाधिकरण) (२०५३-१२५८) (२०५३-१२६७) (२२३५ A ७४१) | अनिवार्य खर्च | १५९८६ | ० | १५९८६ | ४१८९३ | ० | ४१८९३ |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | २००००० | ० | २००००० | १२०००० | ० | १२०००० |
| ८ | संकीर्ण सर्वसाधारण सेवा (२०७५) | अनिवार्य खर्च | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी (२२०५)/ (२२३५) | अनिवार्य खर्च | ३१२ | ० | ३१२ | १९६० | ० | १९६० |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ७६२७८ | ० | ७६२७८ | ६०००० | ० | ६०००० |
| १० | अल्पसंख्याक आयुक्तालय / अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (२२२५) | अनिवार्य खर्च | ० | ० | ० | ८३२९६ | ० | ८३२९६ |
| | | कार्यक्रमा वरील खर्च | ० | ० | ० | ० | ० | ० |

# Financial Statement

(रु. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate २०२६-२७ | | | | Name of the Program |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महसूल | भांडवली | एकूण | महसूल | भांडवली | एकूण | | |
| Revenue | Capital | Total | Revenue | Capital | Total | | |
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| ८७९६६ | ० | ८७९६६ | ९९११२ | ० | ९९११२ | Committed (२०५२) | Secretariat General Services |
| ७०००० | ० | ७०००० | ३०००० | ० | ३०००० | Scheme (२०५२) | |
| ५५९९१ | ० | ५५९९१ | ३८७७९ | ० | ३८७७९ | Committed (२२३५) | Various schemes being implemented by the Minorities Development Department for the overall development of minorities in the State. |
| ११११९९३८ | ० | ११११९९३८ | ९२८९९२० | ० | ९२८९९२० | Scheme (२२३५) | |
| ० | ० | ० | ० | ० | ० | Committed (४२३५) | Maulana Azad Financial Development Corporation for Minorities / National Minorities Development and Financial Corporation |
| ० | २८०००० | २८०००० | ० | १५०००० | १५०००० | Scheme (४२३५) | |
| ० | ० | ० | ० | ० | ० | Committed (४२२५) | Jain Samaj Financial Development Corporation for Minorities / National Minorities Development and Financial Corporation |
| ० | ५०००० | ५०००० | ० | ३०००० | ३०००० | Scheme (४२२५) | |
| १३२४८ | ० | १३२४८ | १५२८९ | ० | १५२८९ | Committed (२२३५ A २४९) | Maharastra State MInority Commission |
| १६२०० | ० | १६२०० | ३०००० | ० | ३०००० | Scheme (२२३५ A २५८) | |
| ४२६२३ | ० | ४२६२३ | २३४९० | ० | २३४९० | Committed (२२३५ A २६७) | Maharastra State Haj Committee |
| १४००० | ० | १४००० | ५०००० | ० | ५०००० | Scheme (४२३५) (२२३५ A २७६) | |
| ३८५३४ | ० | ३८५३४ | ४३४२६ | ० | ४३४२६ | Committed (२०५३) | District Administration (Mahrashtra State Wakf Board/ Tribunal) |
| ८४००० | ० | ८४००० | १५०००० | ० | १५०००० | Scheme (२०५३) | |
| १ | ० | १ | १ | ० | १ | Committed (२०७५) | Miscellaneous General Services |
| ० | ० | ० | ० | ० | ० | Scheme (२०७५) | |
| ६४६० | ० | ६४६० | १९६० | ० | १९६० | Committed (२२०५) | Maharashtra State Urdu Academy |
| ४२००० | ० | ४२००० | ६०००० | ० | ६०००० | Scheme (२२३५) | |
| ७३८०८ | ० | ७३८०८ | ८८७२४ | ० | ८८७२४ | Committed (२२२५) | Minority Commissionerate / Minority Research & Training Institute |
| २३५३९ | ० | २३५३९ | ४०००० | ० | ४०००० | Scheme (२२२५) | |

# अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) बाबत संक्षिप्त माहिती

अल्पसंख्याक विकास विभागाच्या स्थापनेपूर्वी राज्यातील अल्पसंख्याकांशी निगडीत विविध विषय सामान्य प्रशासन विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, महसूल व वन विभाग आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या वेगवेगळया विभागांकडून हाताळले जात होते. हे विषय एकाच मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली आणून त्यायोगे राज्यातील अल्पसंख्याकांच्या विकासासाठी राज्य शासन राबवित असलेल्या कल्याणकारी धोरणामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी तसेच राज्य शासन अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी राबवित असलेल्या विद्यमान योजनांचे परिणामकारक संनियंत्रण करण्याच्या हेतूने व अल्पसंख्याकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध नवीन योजना तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता राज्य शासनाने शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शाकानि-१००८/प्र.क्र.४/२००८/१८ (र. व का.), दि.२१.२.२००८ अन्वये राज्य शासनाचा स्वतंत्र मंत्रालयीन प्रशासकीय विभाग म्हणून अल्पसंख्याक विकास विभागाची निर्मिती केली आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाकडे पुढील कार्यभार सोपविण्यात आला आहे :-

**१) अल्पसंख्याक विकास विभाग**

(१) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाचे समन्वय व आढावा.

(२) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.

(३) महाराष्ट्र राज्य हज समितीचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.

(४) राज्यातील अल्पसंख्यांकांकडून चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जाची मान्यता देणे.

(५) वक्फ (वक्फ अधिनियमासह) व त्या अनुषंगीक बाबींची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे शासकीय स्तरावरील अंमलबजावणी, संनियंत्रण आणि समन्वय.

(६) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचे शासकीय स्तरावरील अंमलबजावणी संनियंत्रण आणि समन्वय.

(७) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.

(८) जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.

(९) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वयन.

(१०) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीचे शासकीय स्तरावरील सनियंत्रण आणि समन्वयन.

(११) न्या. सच्चर समितीच्या स्वीकृत शिफारशी संबंधातील बाबींची अंमलबजावणी, संनियंत्रण आणि समन्वय.

(१२) अल्पसंख्यांकांसाठी केंद्र पुरस्कृत विविध योजनांचे राज्यस्तरीय समन्वयन.

(१३) राज्य शासनाने अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी जाहीर केलेल्या सर्व योजनांचे समन्वयन व आढावा.

(१४) अल्पसंख्यांकांच्या विकासाबाबत वेळोवेळी तज्ज्ञांचे / तज्ज्ञ संस्थांचे अभ्यासगट नेमून त्याआधारे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे.

(१५) अल्पसंख्यांकांशी संबंधित इतर विषय.

**२) सर्वसाधारण**

(१६) अल्पसंख्याक विकास विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

(१७) या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

(१८) या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधात परंतू कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

(१९) राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि अल्पसंख्याक विकास विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

**अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय स्तरावर पुढीलप्रमाणे कार्यालये आहेत :-**

(१) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई.
(२) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
(३) जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
(४) महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई.
(५) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.
(६) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर.
(७) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर.
(८) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी, मुंबई.
(९) अल्पसंख्याक आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.
(१०) अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षणा संस्था (MRTI).
(११) जिल्हा अल्पसंख्याक कक्ष (सर्व जिल्हे).

उपरोल्लेखित कार्यालयांची प्रशासकीय रचना, कार्ये, अधिकारी / कर्मचारीवृंद, वित्तीय लेखाजोखा याबाबतचा तपशील स्वतंत्रपणे या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आला आहे.

# कार्यक्रम क्रमांक (१)

# सचिवालय सर्वसाधारण सेवा

## अ) अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द)

शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:शाकानि-१००८/प्र.क्र.४/२००८/१८ (र. व का.), दि. २१/२/२००८ अन्वये राज्य शासनाचा स्वतंत्र मंत्रालयीन प्रशासकीय विभाग म्हणून अल्पसंख्याक विकास विभागाची निर्मिती करण्यात आली असून या नवनिर्मित विभागासाठी एकूण ६९ पदे मंजूर करण्यात आली आहेत. तथापि वित्त विभागाच्या क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१ दि.१४/१/२०१६ च्या शासन निर्णयास अनुसरून शिपाई संवर्गातील १३ मंजूर पदांपैकी रिक्त असलेली एकूण ४ पदांपैकी २५% पदे म्हणजेच ३ पदे अ.वि.वि.क्र.नियुक्ती-२०१५/प्र.क्र.१४६/का.१ दि.७/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये नियमित करण्यात आली आहेत. त्यामुळे विभागातील एकूण ६९ अस्थायी पदांमधून ३ पदे कमी झालेली असून विभागामध्ये एकूण ६६ पदे कार्यरत आहेत त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतन संरचना | वेतनस्तर | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **गट-अ (भाप्रसे)** | | | | |
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव | संवर्ग पद | | १ |
| **गट-अ राजपत्रित अधिकारी** | | | | |
| २ | सह सचिव | ११८५००-२१४१०० | एस-२७ | १ |
| २ | उप सचिव | ७८८००-२०९२०० | एस-२५ | १ |
| ३ | अवर सचिव | ६७७००--२०८७०० | एस-२३ | ४ |
| **गट-ब राजपत्रित अधिकारी** | | | | |
| ४ | वरिष्ठ स्वीय सहाय्यक | ६७७००-२०८७०० | एस-२३ | १ |
| ५ | कक्ष अधिकारी | ४७६००-१५११०० | एस-१७ | ८ |
| **गट-ब अराजपत्रित कर्मचारी** | | | | |
| ६ | उच्च श्रेणी लघुलेखक | ४४९००-१४२४०० | एस-१६ | ४ |
| ७ | सहायक कक्ष अधिकारी | ३८६००-१२२८०० | एस-१६ | ९ |
| ८ | सहायक संशोधन अधिकारी | ३८६००-१२२८०० | एस-१४ | २ |
| ९ | सहायक लेखाधिकारी | ४१८००-१३२३०० | एस-१५ | १ |
| **गट-क कर्मचारी** | | | | |
| १० | निम्नश्रेणी लघुलेखक | ४१८००-१३२३०० | एस-१५ | २ |
| ११ | लेखापाल | २९२००-९२३०० | एस-१० | १ |
| १२ | लिपिक-टंकलेखक | १९९००-६३२०० | एस-६ | ११ |
| १३ | रोखपाल | १९९००-६३२०० | एस-६ | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | देयक लिपिक | १९९००-६३२०० | एस-६ | १ |
| १५ | वाहन चालक (स्टाफ कार) | १९९००-६३२०० | एस-६ | २ |
| **गट-ड कर्मचारी** | | | | |
| १६ | नाईक | १६६००-५२४०० | एस-३ | २ |
| १७ | रोनिओ ऑपरेटर | १६६००-५२४०० | एस-३ | १ |
| १८ | झेरॉक्स ऑपरेटर | १६६००-५२४०० | एस-३ | १ |
| १९ | शिपाई | १६६००-५२४०० | एस-३ | ५ |
| | **एकूण** | | | **५९** |

**ब) कार्यालयीन आदेश दिनांक ६/०१/२०१६ अन्वये उर्दू साहित्य अकादमीसाठी पुढील प्रमाणे स्वतंत्र पदे चिन्हांकीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.**

| अ.क्र | पदनाम | एकूण पदे | वेतनश्रेणी (रुपये) | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी | १ | ३८६००-१२२८०० | एस-१४ |
| २ | सहायक कक्ष अधिकारी | १ | ३८६००-१२२८०० | एस-१४ |
| ३ | उपसंपादक (उर्दू) | १ | ३५४००-११२४०० | एस-१३ |
| ४ | लिपिक - टंकलेखक | २ | १९९००-६३२०० | एस-६ |
| ५ | देयक लिपिक | १ | १९९००-६३२०० | एस-६ |
| ६ | शिपाई | १ | १५०००-४७६०० | एस-१ |
| | **एकूण** | **७** | | |

## क) राज्य सांप्रदायिक सद्भावना परिषद

राज्यात जातीय सलोखा व सद्भावना वाढीस लागावी, याकरिता मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सांप्रदायिक सदभावना परिषद स्थापन करण्याचा निर्णय शासनाने दि.२३ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्याचप्रमाणे परिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याकरिता व त्याचा द्वैमासिक आढावा घेण्याकरिता मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाच्या सचिवांची सांप्रदायिक सदभावना उच्चाधिकार / शक्ती प्रदान समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्यात जातीय सलोखा व सांप्रदायिक सदभावना वाढीस लावण्याच्या अनुषंगाने दरवर्षी शासनामार्फत पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात येतात :-

१) दि.१९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर कालावधीत **कौमी एकता सप्ताह** साजरा करणे. तसेच दि.२५ नोव्हेंबर हा दिवस **ध्वजदिन** म्हणून पाळणे.

२) राष्ट्रीय सांप्रदायिक सदभाव प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्या **राष्ट्रीय सांप्रदायिक एकता** पुरस्कारासाठी राज्यातून नामनिर्देशन मागवून प्रतिष्ठानास पाठविणे.

# तक्ता - १

# Table - १

## १) वित्तीय आवश्यकता

## i) Financial Requirement

## १) वित्तीय आवश्यकता

(रु. हजारात / Rs. in thousands)

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमा वरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमा वरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **अ** | **कार्याचे वर्गीकरण** | | | | | | |
| | अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) (२०५२ ०६२४) | | | | | | |
| १ | ०१, वेतन | ५३३८१ | ० | ५३३८१ | ७९१३४ | ० | ७९१३४ |
| २ | ०३, अतिकालीक भत्ता | ३० | ० | ३० | १०० | ० | १०० |
| ३ | ०६, दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क | ८ | ० | ८ | २०० | ० | २०० |
| ४ | १०, कंत्राटी सेवा | २२६८ | ० | २२६८ | ३३७५ | ० | ३३७५ |
| ५ | ११, देशांतर्गत प्रवास खर्च | ७९९ | ० | ७९९ | ९१० | ० | ९१० |
| ६ | १२, देशांतर्गत प्रवास खर्च | ०० | ० | ०० | १ | ० | १ |
| ७ | १३, कार्यालयीन खर्च | २७६९ | ० | २७६९ | २२७१ | ० | २२७१ |
| ८ | १७, संगणकावरील खर्च | ३७० | ० | ३७० | ३०० | ० | ३०० |
| ९ | २०, इतर प्रशासकीय खर्च | ०० | ० | ०० | ४०० | ० | ४०० |
| १० | २६, जाहिराती व प्रसिध्दी | ० | ० | ० | ५०० | ० | ५०० |
| ११ | २८, व्यावसायिक सेवा | ० | ० | ० | ३५०० | ० | ३५०० |
| १२ | ५१, मोटार वाहने | ० | ० | ० | ४०० | ० | ४०० |
| | **एकूण** | ५९६२५ | ० | ५९६२५ | ९१०९१ | ० | ९१०९१ |
| | २. राज्य सांप्रदायिक सद्भावना परिषद | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | **एकूण १ + २** | ५९६२५ | ० | ५९६२५ | ९१०९२ | ० | ९१०९२ |
| **ब** | **वित्तीय व्यवस्थेतील साधने** | | | | | | |
| | मागणी क्र. प्रधान शीर्ष ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी | ० | ४०४६ | ४०४६ | ० | १००००० | १००००० |
| | झेडई -०१, २०५२ | ५९६२५ | ४०४६ | ६३६७१ | ९१०९२ | १००००० | १९१०९२ |
| | **एकूण** | ५९६२५ | ४०४६ | ६३६७१ | ९१०९२ | १००००० | १९१०९२ |

## i) Financial Requirement

(रु. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६<br>Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७<br>Budget Estimate २०२६-२७ | | | Name of the Program |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमा वरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| | | | | | | **1.Minority Development Dept** |
| ७५१७७ | ० | ७५१७७ | ८७०४७ | ० | ८७०४७ | ०१ Salaries |
| ८० | ० | ८० | १०३ | ० | १०३ | ०३ Over time Allowances |
| १६० | ० | १६० | २०० | ० | २०० | ०६ Telephone, Electricity & Water Charges |
| ३०३८ | ० | ३०३८ | ३३७५ | ० | ३३७५ | १०-Contractual Services |
| ७२८ | ० | ७२८ | ९३७ | ० | ९३७ | ११ Domestic Travel Expenses |
| १ | ० | १ | १ | ० | १ | १२ Foreign Travel Expenses |
| ४२७१ | ० | ४२७१ | २३३९ | ० | २३३९ | १३ Office Expenses |
| ८०० | ० | ८०० | ३०९ | ० | ३०९ | १७ Computer Expenses |
| २८० | ० | २८० | ४०० | ० | ४०० | २० Other Administration |
| ३५० | ० | ३५० | ५०० | ० | ५०० | २६ Advertising and Publicity |
| २८०० | ० | २८०० | ३५०० | ० | ३५०० | २८ Professional Services |
| २८० | ० | २८० | ४०० | ० | ४०० | ५१ Motor Vehicles |
| ८७९६५ | ० | ८७९६५ | ९९१११ | ० | ९९१११ | Total २०५२६२४ |
| १ | ० | १ | १ | ० | १ | **२. State Communal Harmany Council २०५२०६३३** |
| ८७९६६ | ० | ८७९६६ | ९९११२ | ० | ९९११२ | Total १ + २ |
| | | | | | | B - Source of Finance |
| ० | ७०००० | ७०००० | ० | ३०००० | ३०००० | Demand No.२०५२५१२५ |
| ८७९६६ | ७०००० | १५७९६६ | ९९११२ | ३०००० | १२९११२ | ZE- ०१, २०५२ |
| ८७९६६ | ७०००० | १५७९६६ | ९९११२ | ३०००० | १२९११२ | Total |

# अल्पसंख्याक विकास विभागातील विषयांचे कार्यासन निहाय वाटप.

| कार्यासन क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | (१) अल्पसंख्याक विकास विभागाच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी.<br>(२) अग्रीम (घरबांधणी, भविष्य निर्वाह निधी, स्कूटर/मोटार, मोटार सायकल, संगणक इ.) मंजूर करणे.<br>(३) ठेव संलग्न विमा योजना.<br>(४) विभागातील नवीन पदे निर्माण करणे तसेच पदे पुढे चालू ठेवणे, पद स्थायीकरणाचे प्रस्ताव सादर करणे.<br>(५) विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालये / विभाग प्रमुखाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार प्रदानाचे प्रस्ताव तपासून मान्यता देणे.<br>(६) विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय/विभाग प्रमुखांच्या कार्यालयात वापरात असलेल्या विविध प्रपत्रांना मान्यता देणे.<br>(७) भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदानाबाबत कार्यवाही करणे.<br>(८) विभागीय चौकशी.<br>(९) अल्पसंख्याक विकास विभागातील कोणत्याही कार्यासनास विवक्षित वाटप न केलेल्या सेवाविषयक बाबी.<br>(१०) विभागातील सर्व कार्यासनांकडून विविध मासिक अहवाल मागविणे.<br>(११) विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना ओळखपत्र देणे तसेच शासकीय कामानिमित्त खाजगी व्यक्तींना तात्पुरते मंत्रालय प्रवेशपत्र देणे.<br>(१२) विभागाचे संकेतस्थळ (website) अद्यावत करणे व ई ऑफिस बाबतचे समन्वय.<br>(१३) नागरीकांची सनद तयार करणे.<br>(१४) अल्पसंख्याक आयुक्तालय.<br>(१५) जिल्हा अल्पसंख्याक कक्ष.<br>(१६) अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षणा संस्था (MRTI).<br>(१७) महाराष्ट्र राज्य ऊर्दू साहित्य अकादमी या कार्यालयातील कर्मचा-यांची आस्थापना. |
| २ | (१) अल्पसंख्याक विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची वेतन देयके आहरण व संवितरण.<br>(२) देयकांच्या अनुषंगाने आवश्यक ती हिशेबांची रजिस्टर्स ठेवणे.<br>(३) सेवापुस्तके अद्ययावत ठेवणे.<br>(४) खर्चाचा ताळमेळ घालणे.<br>(५) विनियोजन लेख्याबाबतची माहिती तयार करणे.<br>(६) गट-ड कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेखे ठेवणे.<br>(७) शासकीय कर्मचारी इत्यादिंना कर्जे.<br>(८) नियंत्रक अधिकाऱ्यांनी करावयाच्या खर्च मेळाबाबत समन्वय.<br>(९) प्रलंबित निरीक्षण अहवाल / परिच्छेद.<br>(१०) नागरी अहवाल.<br>(११) महसूली जमा अहवाल.<br>(१२) विभागातील नियंत्रक अधिकाऱ्यांची यादी तयार करणे व अद्ययावत ठेवणे. |
| ३ | १) अल्पसंख्याक विकास विभागात आलेले टपाल स्वीकारणे आणि पाठविणे तसेच नस्त्या स्विकारणे व पाठविणे.<br>(२) फ्रँकिंग मशीन व तिकीटांचा हिशेब ठेवणे.<br>(३) गोपनीय टपालाचे वाटप करणे तसेच बाहेर पाठविण्यात येणारे गोपनीय टपाल सील बंद करून निर्गमित करणे.<br>(४) गट-ड कर्मचाऱ्यांच्या नैमित्तीक व वैकल्पिक रजेचा हिशेब ठेवणे व चक्रमुद्रित प्रती काढून घेणे.<br>(५) अल्पसंख्याक विकास विभागाचे गृह व्यवस्थापन.<br>(६) अल्पसंख्याक विकास विभागातील दुरध्वनी / मोबाईल संबंधीच्या सर्व बाबी.<br>(७) अल्पसंख्याक विकास विभागाला (खुद्द) वाटप करण्यात आलेल्या जागेमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या आसन व्यवस्थेच्या दृष्टीने जागा वाटप करणे.<br>(८) शासकीय वाहने व त्यांचे वाहनचालक. |

| | |
|---|---|
| | (९) वितरण सूची.<br>(१०) अल्पसंख्याक विकास विभागामधील (खुद्द) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना व वाहनचालकांना गणवेश उपलब्ध करून देणे.<br>(११) अल्पसंख्याक विकास विभागाचे ग्रंथालय.<br>(१२) लेखन सामग्रीचा पुरवठा करणे.<br>(१३) अल्पसंख्याक विकास विभागामधील (खुद्द) अधिकाऱ्यांना वृत्तपत्रे, नियतकालिके व प्रकाशने पुरविण्याबाबत.<br>(१४) अल्पसंख्याक विकास विभागातील विविध अधिकारी/ कार्यासने यांनी शासकीय कामकाजासंबंधातील केलेल्या खर्चाची खालील देयके अदा करणे.<br>(अ) शासकीय परिवहन सेवेची देयके.<br>(ब) दूरध्वनी देयके.<br>(क) मंत्रालय उपाहार गृहांची देयके.<br>(ड) इंधनावरील देयके.<br>(इ) भविष्य निर्वाह निधी खातेपत्रकासाठी पूर्वमुद्रित कागदाच्या खरेदीवरील देयके.<br>(ई) हमालावरील देयके.<br>(फ) किरकोळ खर्चाची प्रतिपूर्ती.<br>(य) टॅक्सी प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती.<br>(१५) विभागातील गट-ब,गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर थांबल्याबद्दल चहा व फराळासाठी अतिकालिक भत्ता मंजूर करणे.<br>(१६) नागपूर अधिवेशन कालावधीत रेल्वे व विमानासाठी प्राथम्यपत्र.<br>(१७) विभागात कार्यरत असलेल्या यंत्र सामुग्रीचा दुरुस्ती व देखभाल, दरकरार विषयक बाबी हाताळणे.<br>(१८) शासकीय वाहन अनुज्ञेय असलेल्या शासकीय अधिकाऱ्यांना शासकीय वाहनाऐवजी खाजगी वाहन वापरल्याबद्दल होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करणे.<br>(१९) नवीन फर्निचर बनवून घेणे, जुन्या फर्निचरची दुरुस्ती करून घेणे.<br>(२०) विधानमंडळ कामकाजाशी संबंधित अल्पसंख्याक विकास विभागातील समन्वयाची कामे.<br>(२१) विधानसभा / विधानपरिषद प्रश्न व आश्वासने यासंबंधात समन्वय व पाठपुरावा करणे.<br>(२२) विधानमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनासंबंधातील व्यवस्था.<br>(२३) मा.राज्यपालांना सादर करावयाचा एकत्रित मासिक अहवाल.<br>(२४) मा.राज्यपाल महोदय यांचे भाषण तयार करणे.<br>(२५) लोकलेखा समिती संबंधीचे कामकाज.<br>(२६) विभागातील इतर संकिर्ण विषय. |
| ४ | (१) वक्फ (वक्फ अधिनियमासह) व त्या अनुषंगीक बाबींची महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.<br>(२) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायधिकरणाचे संनियंत्रण आणि समन्वय.<br>(३) राज्यात बांधण्यात येणाऱ्या उर्दू घरांचे सनियंत्रण आणि समन्वय.<br>(४) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.<br>(५) वृक्षारोपण आणि संगोपन<br>(६) अल्पसंख्याक लोकसमुहाकरीता धर्मक्षेत्र व परिसर विकास योजना |
| ५ | (१) राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून मान्यता प्रदान करणे.<br>(२) महाराष्ट्र राज्य हज समितीचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वयन.<br>(३) राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग, राष्ट्रीय धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक आयोग, आयुक्त, भाषा-जात अल्पसंख्याक यांच्या शिफारशींवरील कार्यवाही.<br>(४) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीचे शासकीय स्तरावर सनियंत्रण व समन्वय.<br>(५) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.<br>(६) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्या. यांना भागभांडवल देणे.<br>(७) जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वय.<br>(८) जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्या. यांना भागभांडवल देणे. |

| | |
|---|---|
| ६ | (१) धार्मिक अल्पसंख्याक समूदायासाठी विद्यार्थी बहुल शासनमान्य शाळांना पायाभूत सुविधांसाठी सहायक अनुदान योजना.<br>(२) केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना (समन्वय).<br>(अ) गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती योजना.<br>(ब) पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.<br>(क) प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.<br>या केंद्र पुरस्कृत योजनांपैकी (अ) व (ब) येथील नमुद योजना उच्च व तंत्र शिक्षण तसेच (क) येथील नमूद योजना शालेय शिक्षण विभागाकडून राबविण्यात येत आहेत.<br>(३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर शिक्षण घेणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना.<br>(४) डॉ. झाकीर हुसेन मदरसा अधुनिकीकरण योजना.<br>(५) परदेशात पदव्युत्तर पदवी व पीएचडी करत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना.<br>(६) राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्केपेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्वस्त / सदस्यांची संख्या असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतीक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना. |
| ७ | (१) अर्थसंकल्पीय अंदाज (सुधारित अर्थसंकल्पासह) व त्या अनुषंगिक इतर सर्व बाबींचे समन्वय.<br>(२) कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणे.<br>(३) वित्त मंत्र्यांचे भाषण.<br>(४) अर्थसंकल्पविषयक सर्व बाबी.<br>**योजना -**<br>(१) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (PMJVK).<br>(२) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (राज्य हिस्सा). |
| ८ | (१) न्या.सच्चर समितीच्या स्वीकृत शिफारशी संबंधातील बाबींचे संनियंत्रण आणि समन्वयन.<br>(२) राज्य सांप्रदायिक सदभावना परिषद<br>(३) दि.१९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर कालावधीत कौमी एकता सप्ताह साजरा करणे.<br>(४) दि.२५ नोव्हेंबर हा दिवस ध्वजदिन म्हणून पाळणे.<br>(५) दि.२० ऑगस्ट हा दिवस सदभावना दिवस साजरा करणे.<br>(६) महाराष्ट्र शासनाचा इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार देणे.<br>**योजना**<br>१. अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यीनींकरिता वसतीगृह योजना.<br>२. अल्पसंख्याक सकेंद्रित क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहायक अनुदान.<br>३. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी / तिसरी पाळी सुरू करण्याकरिता सहायक अनुदान.<br>४. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नविन तंत्रनिकेतन संस्था सुरू करण्यासाठी सहायक अनुदान.<br>५. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरू करणे.<br>६. अल्पसंख्याक समाजातील यंत्रमागधारकांच्या आधुनिकीकरणासाठी अनुदान योजना.<br>७. अल्पसंख्याकांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करणे.<br>८. अल्पसंख्याक हक्क दिवस पाळणे. |
| ९ | १) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वयन.<br>२) बचत गट योजना.<br>३) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाचे समन्वय व आढावा.<br>४) मौलाना आझाद मोफत शिकवणी व संलग्न योजना.<br>५) नागरी सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि पोलिस भरतीपूर्व निवासी प्रशिक्षण, मराठी फाऊंडेशन वर्ग<br>६) अल्पसंख्याक कल्याण समित्या. |

| | |
|---|---|
| | ७) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नागरी क्षेत्रविकास कार्यक्रमातंर्गत सहायक अनुदान.<br>८) राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामिण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत सहायक अनुदान.<br>९) राज्यातील अल्पसंख्याक महिला व युवकांकरीता कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम.<br>१०) अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी हेल्पलाईनची सुविधा उपलब्ध करुन देणे.<br>११) अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी देणे.<br>१२) मराठवाडा, विदर्भ, जलद विकास कार्यक्रम, २०१८ अंतर्गत औरंगाबाद, अमरावती, नागपूर मा.महसूली विभागातील १५ जिल्हयांमध्ये अल्पसंख्याक महिलांचे बचतगट निर्माण करणे व त्यातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे. |

## कार्यक्रम क्रमांक – (२)
## राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पसंख्याक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना.

**१) धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित कायम / विना अनुदानित/विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना:-**

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे बाहुल्य असलेल्या राज्यातील शासन मान्यताप्राप्त अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु.2.00 लक्ष इतके अनुदान देण्याची योजना सन 2008-09 पासुन राबविण्यात येत आहे. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक-अविवि:2015/प्रक्र.80/15/का-6 दिनांक: 07/10/2015 अन्वये सदर योजना सुधारीत स्वरुपात राबविण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ७.१०.२०२४ अन्वये सदर योजनेअंतर्गत पायाभूत सोयीसुविधेसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा रू. २.०० लाखावरून वाढवून रू. १०.०० लाख करण्यात आली आहे.

**(अ) योजनेचा लक्ष्यगट** - राज्यातील शासन मान्यता प्राप्त अनुदानित / विना अनुदानित/ कायम विनाअनुदानित खाजगी अल्पसंख्याक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका / नगरपरिषद शाळांमध्ये ७० टक्के व अपंग शाळांमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षण आहेत, अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.

**(ब) योजनेचे उद्दिष्ट:-** राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्राबल्य असलेल्या राज्यातील शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन शिक्षणाचा दर्जा उंचावणे.

**(क) योजना :-** या योजनेअंतर्गत राज्यातील शासन मान्यताप्राप्त अनुदानित/ विना अनुदानित / कायम विना अनुदानित खाजगी अल्पसख्याक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका / नगरपरिषद शाळांमध्ये ७० टक्के व अपंग शाळांमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षण आहेत, अशा शाळांच्या इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी, शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे, ग्रंथालय अद्यावत करणे, प्रयोगशाळा उभारणे व अद्ययावत करणे, संगणक कक्ष उभारणे /अद्ययावत करणे, प्रसाधनगृह डागडुजी करणे / स्वच्छतागृह उभारणे, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फर्निचर, इन्वर्टर (मुंबई शहर व उपनगरे वगळून) जनरेटरची सुविधा निर्माण करणे / झेरोक्स मशीन, अध्ययनाची साधने) **Learning Material /** (एलप्रोजेक्टर.डी.सी., अध्ययनासाठी लागणारे विविध सॉफटवेअर इत्यादी, इंग्रजी लेंग्वेज लॅब, संगणक हार्डवेअर सॉफटवेअर / इत्यादींसाठी कमाल रू.१०.०० लक्ष पर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन 2026-27) - रू.22.00 कोटी.**

**(इ) योजनेचे भौतिक उद्दीष्ट** - २२० शाळा

**(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:-** जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी कार्यालय व प्रशासकीय विभाग पातळीवर अल्पसंख्याक विकास विभाग.

**२) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना:-**

**अ) योजनेचा लक्ष्यगट:** राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उच्च व तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेत असलेले विद्यार्थी.

**ब) योजनेचे उद्दिष्ट:-** अल्पसंख्याक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्रेरीत करणे.

**क) योजना :-** या योजनेंतर्गत अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात आलेल्या वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रुपये ५०,०००/- (वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम/तांत्रिक व व्यावसायीक शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी) रु. ५,०००/- (इयत्ता १२ वी नंतरचे अभ्यासक्रम उदा. कला, वाणिज्य व विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ) यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. सदरहू योजनेसाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे सर्व स्तोत्राद्वारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे व विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. या योजनेतंर्गत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येतात व शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये ईसीएस पध्दतीद्वारे थेट जमा करण्यात येते. दि .२९/०७/२०१५ रोजीच्या शासन

निर्णयान्वये सदर योजनेतंर्गत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुंटुबाची सर्व स्रोतांव्दारे मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.६.०० लाखांवरुन रु.८.०० लाख करण्यात आली आहे.

**ड) योजनेकरिता आर्थिक तरतूद (सन २०२६-२७): रु. ८१.५८ कोटी.**

ई) भौतिक उद्दिष्ट :- दरवर्षी १९५०० नवीन विद्यार्थी अधिक नुतनीकरणाच्या शिष्यवृत्ती.

(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- संचालक (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व प्रशासकीय विभाग पातळीवर अल्पसंख्याक विकास विभाग.

**३) राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच्. डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजना :**

अल्पसंख्याक समुदायातील मुलांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून शासनाकडून प्रतिवर्षी अल्पसंख्याक समुदायातील २७ विद्यार्थ्यांसाठी "परदेश शिष्यवृत्ती योजना" राबविण्याचा निर्णय दि. २३ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला असून दिनांक २१.०८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना सुधारीत स्वरूपात राबविण्यात येत असून त्यानुसार सदर विद्यार्थ्यांची संख्या एकूण ७५ करण्यात आली आहे. विद्यार्थी निवडीची प्रक्रिया आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत चालू आहे.

(अ) योजनेचा लक्ष्यगट - केंद्र अथवा महाराष्ट्र शासनाने धार्मिक अल्पसंख्याक म्हणून घोषीत केलेल्या समुदायातील व महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थी.

(ब) योजनेचे उद्दीष्ट- अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित असलेल्या होतकरू व गुणवत्ता धारक मुलांना परदेशात शिक्षणाची संधी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळवून देणे.

(क) योजना - क्यूएस वर्ल्ड रॅन्कींग (Qs World Ranking) मधील २०० च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये पदव्युत्तर पदवी आणि पी. एच. डी अभ्यासक्रमासाठी बीनशर्त (Unconditional) प्रवेशास पात्र ठरलेल्या महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समूदायातील ७५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी शिष्यवृत्ती मंजूर करणे.

**(ड) योजनेचे निकष :**

१. विद्यार्थ्याने या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना, त्याने यापूर्वी महाराष्ट्र शासनाची वा कोणत्याही अन्य विद्यापीठाची वा इतर कोणत्याही राज्य शासनाची वा केंद्र शासनाची वा अन्य संस्थांकडून परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.

२. परदेशातील विद्यापीठ / शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशीत असावा, तसेच अभ्यासक्रमाचा कालावधी कमीत कमी दोन वर्षाचा असावा.

३. एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किवा एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदवीका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाही.

4.शैक्षणिक अर्हता - पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवी परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे.

**५.वयोमर्यादा** - पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्याची कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे आणि पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आहे.

**६.उत्पन्न मर्यादा** - विद्यार्थ्यांच्या पालकांचे / कुटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याच्या स्वतःच्या उत्पन्नासह सर्व स्रोतातून मिळणारे उत्पन्न रू. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी अविविहीत असल्यास कुटुंबामध्ये त्याच्या पालकांचा समावेश असेल. विद्यार्थी विवाहीत असल्यास कुटुंबामध्ये पती / पत्नीचा समावेश असेल. एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करून देणे बंधनकारक आहे. तसेच सदर परदेश शिष्यवृत्तीचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच अनुज्ञेय आहे.

**ई) योजनेकरिता आर्थिक तरतूद (सन २०२६-२७):- रु.२०.०० कोटी.**

उ) भौतिक उद्दिष्ट :- दरवर्षी 75 विद्यार्थी.

ऊ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे व प्रशासकीय विभाग पातळीवर अल्पसंख्याक विकास विभाग.

**३) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी सहायक अनुदान:-**

(अ) योजनेचा लक्ष्यगट:- केंद्र शासनाने निश्चित केलेल्या महाराष्ट्रातील ४३ अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांसाठी प्राधान्याने तसेच ज्या शहरांच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्यांकांची लोकसंख्या **किमान** १० टक्के पेक्षा जास्त आहे, अशी शहरे.

(ब) योजनेचे उद्दिष्ट:- अल्पसंख्याक बहूल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे.

(क) योजना:- या योजनेंतर्गत महानगरपालिका/ नगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात पुढील मूलभूत नागरी सोयीसुविधांसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(१) कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती,
(२) पिण्याच्या पाण्याची सुविधा, (३) विद्युत पुरवठा,
(४) सांडपाण्याची व्यवस्था, (५) रस्ते / पथदिवे,
(६) सार्वजनिक स्वच्छतागृहे, (७) अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इत्यादी.
(८) समाज मंदिर / सामाजिक सभागृह इ. (९) इदगाह विकास.

सदरहू योजनेअंतर्गत महानगरपालिकांना रु.२० लाख, "अ" वर्ग नगरपालिकांना रु.१५ लाख तर "ब" व "क" वर्ग नगरपालिकांना रु.१० लाखापर्यंत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रु.११७.०० कोटी.**

(इ) भौतिक उद्दिष्ट: म.न.पा/न.पा/न.प.

(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- जिल्हाधिकारी कार्यालय व अल्पसंख्याक विकास विभाग.

**४) राज्यातील अल्पसंख्याक समस्यांबाबत संशोधन, अल्पसंख्याकांशी निगडीत बाबी हाताळणाऱ्या राज्य प्रशासनातील अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण व राज्य शासनाने अल्पसंख्याकांसाठी घोषित केलेल्या योजनांना प्रसिध्दी:-**

अ) योजनेचा लक्ष्यगट :- राज्यातील अल्पसंख्याक समाज.

ब) योजनेचे उद्दिष्ट :- राज्यातील अल्पसंख्याकांना शिक्षण, आरोग्य, निवास सुविधा, रोजगार, पतपुरवठा व इतर मुलभूत सुविधा प्राप्त करण्यासाठी सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या विविध प्रश्नांबाबत संशोधन करून त्यावर उपाययोजना करणे, "अल्पसंख्याकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे" या विषयावर राज्य प्रशासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे व राज्य शासनाने अल्पसंख्याकांसाठी जाहीर केलेल्या योजनांना विस्तृत प्रसिध्दी देणे.

क) योजना:- या योजनेंतर्गत राज्यातील अल्पसंख्याकांच्या विविध समस्यांविषयक यशदा, पुणे यांच्यामार्फत संशोधन करण्यात येवून त्यावर उपाययोजना सूचविण्यात येतील तसेच "अल्पसंख्याकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे" या विषयावर राज्य प्रशासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना यशदा, पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. राज्य शासन राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबतची माहिती राज्यातील जनसामान्यापर्यंत पोहोचावी या उद्देशाने या सर्व योजनांना महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत दुरदर्शन व राज्यातील सर्व भाषांमधील प्रमुख वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात येत आहे.

ड) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग मुंबई व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे.

**इ) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७) :- रु.१५०.०० कोटी.**

**५) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी हेल्पलाईनची सुविधा:-**

**(हेल्पलाईन क्र. १८००२२५७८६)**

(अ) योजनेचा लक्ष्यगट:- राज्यातील अल्पसंख्याक समाज.

(ब) योजनेचे उद्दिष्ट:- राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लिम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख, पारसी व ज्यु या समाजाच्या लोकांना शासकीय कामकाजाबाबत वेळोवेळी उद्भवणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन व राज्य शासनाने राज्यातील अल्पसंख्याक समाजासाठी सुरु केलेल्या विविध योजनांबाबत संबंधित लोकांच्या शंकाचे निरसन करणे.

(क) योजना:- राज्यातील अल्पसंख्याकांना शासनाच्या अल्पसंख्याक विषयक विविध धोरणात्मक निर्णयाबाबत अवगत करण्याकरिता, त्यांना दैनंदिन जीवनात सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या अडचणींच्या दृष्टीने त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्याकरिता तसेच राज्य शासन राज्यातील अल्पसंख्याकांकरिता राबवित असलेल्या विविध विकास योजनांबाबत अचूक माहिती देण्यासाठी व त्याअनुषंगाने त्यांच्या शंकांचे निरसन करण्याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयात एक हेल्पलाईन सुविधा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

(ड) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई.

**(इ) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रु.१०.०० लक्ष.**

**६) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी विद्यमान ४२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसऱ्या/तिसऱ्या पाळीमध्ये अभ्यासक्रम सुरु करणे**:-

(अ) योजनेचा लक्ष्यगट:- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) विद्यार्थी

(ब) योजनेचे उद्दिष्ट:- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व्यवसायिक शिक्षण देणे.

(क) योजना:- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व्यवसायिक शिक्षण देण्यासाठी मांडवी (मुंबई शहर) व चांदिवली (मुंबई उपनगर) येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व राज्यातील अल्पसंख्याक बहुल 42 विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुस-या / तिसऱ्या पाळीमध्ये अभ्यासक्रम सुरु करण्यास उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.२९.०८.२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सप्टेंबर, २०१० पासून ४२ विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुस-या / तिसऱ्या पाळीमध्ये अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रु.२०.०० कोटी.**

(इ) भौतिक योजना:- ४४१६ विद्यार्थी

(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई,

**७) राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतन संस्था सुरु करणे**:-

(अ) योजनेचा लक्ष्यगट:- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) बेरोजगार उमेदवार.

(ब) योजनेचे उद्दिष्ट:- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांमधील बेरोजगार उमेदवारास रोजगार मिळण्यास मदत करणे.

(क) योजना:- अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने नवीन तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार मुक्ताई नगर जि. जळगाव येथे नवीन तंत्रनिकेतन निर्माण करण्यात येत आहे. अनुदान अल्पसंख्याक विकास विभागाकडून उपलब्ध करुन दिले जाईल.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रूपये २.०० कोटी.**

(ई) भौतिक उद्दिष्ट: ०१ तंत्रनिकेतन

(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- अल्पसंख्याक विकास विभाग व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

**८) राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे सुरु करणे:-**

(अ) योजनेचा लक्ष्यगट :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व ज्यू) विद्यार्थी.

(ब) योजनेचे उद्दिष्ट :- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना रोजगाराभीमुख व्यावसायिक शिक्षण देणे.

(क) योजना :- राज्यातील अल्पसख्यांक विद्यार्थ्यांसाठी मांडवी, मुंबई शहर व चांदिवली, मुंबई उपनगर अशा दोन नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यास उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.२९.०८.२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे आल्या आहेत. मांडवी, मुंबई येथील औदयोगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम पूर्ण झाले असून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सदर संस्थेत प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले आहे. चांदीवली, मुंबई उपनगर येथील औदयोगिक प्रशिक्षण संस्थेच्या बांधकामाकरीता अंदजपत्रक मागविण्यात आले असून, सदर संस्थेचे प्रशिक्षण वर्ग सध्या मुलुंड येथे सुरू करण्यात आले आहेत. मुंब्रा-कौसा येथे औद्योगिक संस्था निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात आली असून बांधकाम सुरु आहे.

**ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रुपये २.०० कोटी**

(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- अल्पसंख्याक विकास विभाग व संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**९) अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या (मुले/मुली) आहाराकरिता थेट रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करणे.**

**(अ) योजनेचा लक्ष्यगट**:- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व ज्यु) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी.

**(ब) योजनेचे उद्दिष्ट :-** अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणणे व त्यांना उच्च शिक्षण देणे सोयीचे व्हावे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे.

**(क) योजना:-** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या शासकीय वसतिगृहात राहणा-या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या (मुले/मुली) आहाराकरीता थेट रक्कम त्यांच्या आधार संलगन बँक खात्यात जमा करण्याबाबतचा निर्णय दि.१२/१०/२०२१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७) :- रु.१.०० कोटी.**

**(ई) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:-** संबंधित जिल्हाधिकारी व अल्पसंख्याक विकास विभाग.

**१०) प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (PMJVK)**

(अ) योजनेचा लक्ष्यगट:- अल्पसंख्याक समाजातील लोक

(ब) योजनेचे उद्दिष्ट:- अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यातील लोकांच्या एकंदर राहणीमानाचा दर्जा उंचावणे, या भागात मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन सामाजिक व आर्थिक स्तरात सुधारणा घडवून आणणे.

आता बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम (MsDP) या कार्यक्रमाचे केंद्रशासनाकडील मार्गदर्शक सुचनांनुसार नावात बदल करुन `प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (PMJVK)` असे नामकरण करण्यात आले आहे. बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत यापूर्वी महाराष्ट्र राज्यातील ०९ जिल्हे , ०८ गट व ०६ शहरे यांची निवड करण्यात आली होती. तथापि आता केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रातील एकूण २४ जिल्ह्यातील १० जिल्हा मुख्यालये, २८ गट व ३४ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमाचा झालेला सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाद्वारे सदर कार्यक्रम १५ व्या वित्त आयोगाच्या कालावधी पर्यंत (२०२१-२२ ते २०२५-२६) सुरु ठेवण्यास मान्यता देऊन योजनेच्या व्याप्तीत वाढ केली आहे. त्यानुसार सध्यस्थितीत सदर योजनेअंतर्गत राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार राज्य ज्या अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक लोकसंख्येचे प्रमाण २५% पेक्षा जास्त आहे अश्या ठिकाणी पायाभूत सुविधा प्रकल्प प्रस्तावित करू शकते. तसेच सदर योजनेत केंद्र व राज्याच्या हिश्श्याचे निधीचे प्रमाण 60:40 असे आहे. प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम अंतर्गत शिक्षण, आरोग्य, कौशल्य आणि महिला केंद्रीत प्रकल्प या महत्त्वाच्या क्षेत्रातील प्रकल्पासह राष्ट्रीय महत्त्वाच्या उदयोन्मुख क्षेत्रांना प्राधान्य दिले जाईल ज्यामध्ये खेळ, पिण्याचे पाणी, स्वच्छता, सौर ऊर्जा इ. सद्भाव मंडप यासारखे खालील प्रकल्पांचा समावेश आहे.

(क) **योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- (राज्य हिस्सा) रु.८०.०० कोटी (केंद्र हिस्सा) रु.१२०.०० कोटी.**

(ड) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- संबंधित जिल्हाधिकारी व अल्पसंख्याक विकास विभाग.

**११) अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थीनीसाठी वसतीगृह योजना**

(अ) योजनेचा लक्ष्यगट:- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व ज्यु) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी.

(ब) योजनेचे उद्दिष्ट:- अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतीगृहाची सोय उपलब्ध करुन मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवणे.

(क) योजना:- राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थीनींसाठी वसतीगृहे बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यापैकी केंद्र शासनाने राज्यातील ज्या २५ जिल्हयांमधील ४३ शहरे "अल्पसंख्याक बहुल क्षेत्रे" घोषित केली आहेत, अशा २५ जिल्हयांमध्ये प्राथम्याने वसतीगृह उभारण्यात येतील. वसतीगृहांसाठी शासकीय जमीन किंवा विद्यापीठांकडून जमीन उपलब्ध करून घेण्यात येऊन वसतीगृहाचे बांधकाम सिडको/ सार्वजनिक बांधकाम विभाग/ म्हाडा मार्फत करण्यात येईल.

सदर वसतीगृहे अल्पसंख्याक विकास विभागामार्फत नेमुन दिलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था /तंत्रनिकेतन/ विद्यापीठ/ शासकीय महाविद्यालये यांचेकडून व्यवस्थापन करण्यात येईल.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रुपये ३.०० कोटी**

(ई) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- संबंधित जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापनाकरिता नेमुन दिलेली शाळा संस्था/विद्यापिठ/महाविद्यालय व अल्पसंख्याक विकास विभाग.

**१२) राज्य अल्पसंख्याक आयोगाला सहायक अनुदान**

या योजनेतंर्गत आयोगामार्फत राबविण्यात येत असलेल्या मराठी भाषा फौंडेशन वर्ग या योजनेकरिता अनुदान देण्यात येते.

**(क) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रु.३.०० कोटी.**

**१३) राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्केपेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्वस्त / सदस्यांची संख्या असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतीक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना:-**

राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेच्या विश्वस्त / सदस्यांमध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त बौद्ध विश्वस्त / सदस्य असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतीक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थाचे बळकीटकरण करण्यासाठी सदर संस्थाना पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता रू. १० लाखापर्यंत अनुदान देण्याची योजना सन २०२४-२५ पासून सुरु करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र. अविवि २०२४/ प्र.क्र. ७५/का-६ ,दिनांक : ०७/१०/२०२४ अन्वये सदर योजनेअंतर्गत पायाभूत सोयीसुविधेसाठी देण्यासाठी अनुदानाची मर्यादा रु. १०.०० लाख आहे.

**(अ) योजनेचा लक्ष्यगट -** राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेच्या विश्वस्त / सदस्यांमध्ये ५१ टक्केपेक्षा जास्त बौद्ध विश्वस्त / सदस्य असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतीक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्था

**(ब) योजनंचे उद्दिष्ट :-** बौद्ध समाजातील सांस्कृतीक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देऊन समाजाचा दर्जा उंचावणे.

**(क) योजना :-** या योजनेअंतर्गत राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेच्या विश्वस्त / सदस्यांमध्ये ५१ टक्केपेक्षा जास्त बौद्ध विश्वस्त / सदस्य असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतीक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना - इमारतीचे किरकोळ नुतनीकरण व डागडुजी, शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे, ग्रंथालय / वाचनालय/अभ्यासिका अद्यावत करणे,विपश्यना केंद्राचे किरकोळ नुतनीकरण / डागडुजी, संगणक कक्ष उभारणे / अद्ययावत करणे प्रसाधनगृह / स्वच्छतागृह उभारणे / डागडुजी करणे, संस्थेसाठी आवश्यक फर्निचर, प्रशिक्षण केंद्राचे किरकोळ नुतनीकरण/डागडुजी, रिसर्च सेंटर अद्यावत करण्यासाठी साहित्यसामुग्री/संगणक खरेदी करणे, जनरेटर/इनव्हेटर, सोलार सुविधा निर्माण करणे, सिक्युरिटी कॅमेरे बसविणे, कार्यशाळा / सभागृह खोलीचे बांधकाम/सुशोभिकरण/नुतनीकरण (भाडे तत्वावरील इमारतीसाठी लागू नाही )

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७) रु. ५.०० कोटी.**

**(इ) योजनेचे भौतीक उद्दीष्ट** - १०० संस्था (अंदाजे).

**(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा** - जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी कार्यालय व प्रशासकीय विभाग

**१४) हज समितीकरिता सहायक अनुदान**

हज यात्रेकरूंच्या सुविधेकरिता औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्यात येत आहे.

**योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रु. ५.०० कोटी**

**१५) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान.**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांकरिता भागभांडवल देण्यात येते.

**योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७) :- रुपये ५.०० कोटी.**

**१६) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुस-या पाळीमध्ये अभ्यासक्रम सुरू करणे.**

**(अ) योजनेचा लक्ष्यगट :-** राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व ज्यु) विद्यार्थी

**(ब) योजनेचे उद्दिष्ट :-** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख तांत्रिक शिक्षण देणे.

**क) योजना** :- सन २०११-१२ पासून ठाणे, सोलापूर, जळगाव, नांदेड, यवतमाळ, मुंबई शहर व मुंबई उपनगर अशा ७. सन २०१२-१३ पासून रत्नागिरी, जालना, अंबड, ब्रम्हपुरी, कराड या ५ व सन २०१४-१५ पासून पुणे, लातूर व हिंगोली अशा ३ याप्रमाणे एकूण १५ विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरु करण्यात आली असून त्याबाबतचे शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अनुक्रम दिनांक १३.०९.२०११, दिनांक १९.०७.२०१२ व दि. ८.०७.२०१४ रोजी निर्गमित केले आहेत.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रुपये १०.०० कोटी.**

**(इ). भौतिक उद्दिष्ट:** 1920 विद्यार्थी.

**(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा** :- संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, **मुंबई.**

**१७) राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमातंर्गत अनुदान उपलब्ध करण्याबाबत:-**

अ) योजनेचा लक्ष्यगट: - राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक समुहाची (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व ज्यु) लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायती.

ब) योजनेचे उद्दिष्ट:- अल्पसंख्याक बहूल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत /पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

क) योजना:- या योजनेंतर्गत पात्र ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात पुढील मूलभूत/पायाभूत सोयीसुविधांसाठी सन २०१३-२०१४ या वर्षापासून अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

(अ) कब्रस्तान/स्मशान/अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंतीसह सर्व सुविधा,

(ब) सार्वजनिक सभागृह/शादीखाना हॉल.

(क) सर्व नागरी/पायाभूत सुविधा उदा.पिण्याच्या पाण्याची सुविधा/ विद्यूत पुरवठा/इदगाह/ सांडपाण्याची व्यवस्था/ रस्ते / पथदिवे/सार्वजनिक स्वच्छतागृहे , अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इत्यादी

सदरहू योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहूल ग्रामपंचायतींना प्रतिग्रामपंचायत कमाल रू.१० लाखापर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रु.११७.०० कोटी**

(इ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा: जिल्हाधिकारी कार्यालय / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व अल्पसंख्याक विकास विभाग.

## १८) डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना :

मुस्लिम समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या न्या. सच्चर समितीच्या शिफ़ारशींच्या अनुषंगाने व राज्यातील पंतप्रधानाच्या नवीन 15 कलमी कार्यक्रमांतर्गत अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक विकास आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ.९वी, इ.१०वी, ११ वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होऊन त्यांची रोजगार क्षमता वाढून आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल या दृष्टिने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देण्याची डॉ झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक-अविवि:२०१०/प्र.क्र.१५२/१०/ का-६, दिनांक: ११ ऑक्टोबर, २०१३ अन्वये सन २०१३-१४ पासून राबविण्यात येत होती. सदरहू योजना आता शासन निर्णय क्रमांक: अविवि २०२३ प्र.क्र.७७/ का-६ दिनांक २२ डिसेंबर, २०२३ अन्वये सुधारीत स्वरूपात राबविण्यात येणार आहे. राज्यातील वक्फ बोर्डाकडे व धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत मदरशांना या योजनेचा लाभ देण्यात येणार असून नोंदणी करुन ३ वर्ष पूर्ण झालेल्या तसेच अल्पसंख्याक बहुल जिल्हयातील व तालुक्यातील मदरशांना या योजनेत प्राधान्य देण्यात येते ज्या मदरसांना Scheme for Providing Quality Education in Madrassa (SPQEM) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत लाभ मिळाला आहे अशा मदरशांना ही योजना अनुज्ञेय नाही.

**(अ) योजनेचा लक्ष्यगट** - राज्यातील वक्फ बोर्डाकडे व धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेले मदरसे.

(ब) योजनेचे उद्दिष्ट :- मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ.९ वी, इ.१०वी, ११ वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती देणे.

(क) योजना:- या योजनेअंतर्गत मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ.९ वी, इ.१० वी, ११ वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती देणे तसेच मदरसाच्या इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी, पेयजलाची व्यवस्था करणे, प्रसाधनगृह उभारणे व त्याची डागडुजी करणे, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फर्निचर, मदरसाच्या निवासस्थानात इन्वर्टरची सुविधा उपलब्ध करणे, मदरसांच्या निवासी इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी, संगणक, हार्डवेअर, सॉफ्टव्र, प्रिंटर्स इ., प्रयोगशाळा साहित्य, सायन्स कीट, मॅथेमॅटीक्स कीट व इतर अध्ययन साहित्य, सौर उर्जा प्रकल्प बसविण्यासाठी, मदरशांना क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे, स्मार्ट बोर्डसह प्रोजेक्टर बसविणे, डीजीटल अभ्यासक्रम उपलब्ध करणे या पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी रू. १०.०० लक्ष पर्यंत अनुदान देण्यात येते.

**(ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७) - रू. १०.०० कोटी.**

(इ) योजनेचे भौतीक उद्दीष्ट - १६५ मदरसे.

**(फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:**- जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी कार्यालय व प्रशासकीय विभाग पातळीवर अल्पसंख्याक विकास विभाग.

**१९) राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवाराकरीता मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना**:-

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत रोजगारांच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देण्याकरीता केंद्रीय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकिग सेवा इत्यादी स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण तसेच व्यवसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेशाकरीता घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणआणि इयत्ता १० वी, १२ अनुत्तीर्ण अल्पसंख्याक उमेदवारांकरीता विशेष शिकवणी वर्ग सुरू करण्यासाठी दि.२५.०६.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंध्द योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई, ठाणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, पुणे व नाशिक या ०७ शहरांमध्ये प्रशिक्षण केंद्रांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याकरीता नामांकित खाजगी संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले असून सध्या निवडीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. तसेच इच्छुक उमेदवारांकडून ऑन लाइन अर्ज मागविण्यात आले आहे. प्रशिक्षणबाबतची तपशीलवार माहिती जसे प्रशिक्षणाचा प्रकार, उमेदवारांची संख्या, प्रशिक्षणांचा कालावधी व प्रत्येक उमेदवाराला फी च्या स्वरूपात द्यावयाची अधिकतम रक्कम इत्यादी खालीलप्रमाणे आहे.

(१) **योजनेकरीता अर्थसंकल्पीय तरतुद (सन २०२६-२७) :- रूपये ५.०० कोटी.**

(२) भौतिक उद्दिष्ट: ४००० विद्यार्थी

(३) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा: अल्पसंख्याक विकास विभाग.

| **अ.क्र.** | **प्रशिक्षणाचा प्रकार** | **उमेदवाराची संख्या** | **प्रशिक्षणाचा कालावधी** | **प्रति उमेदवाराकरीता द्यावयाची फी ची अधिकतम रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १. | केंद्रिय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या विविध स्पर्धा परिक्षेच्या तयारी करीता प्रशिक्षण | २५० | १० महिने | रू. २५,०००/- |
| २. | महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राजपात्रित अधिकारी या पदांकरीता घेण्यात येणा-या विविध स्पर्धा परीक्षेच्या तयारी करीता प्रशिक्षण. | २५० | १० महिने | रू. २०,०००/- |
| ३. | महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अराजपात्रित अधिकारी या पदांकरीता घेण्यात येणा-या विविध स्पर्धा परीक्षेच्या तयारी करीता प्रशिक्षण. | ५०० | १० महिने | रू. १५,०००/- |
| ४. | बँकिंग सेवेतील परीक्षांकरीता प्रशिक्षण. | ४०० | ६ महिने | रू. ८,०००/- |
| ५. | सामाईक प्रवेश परिक्षा | ६०० | २ वर्ष | रू. ४०,००० |
| (अ) | अभियांत्रिकी | २०० | १ वर्ष / २ वर्ष | रू. २०,०००/- (रू. ४०,०००/- २ वर्षांकरीता) |
| (ब) | वैद्यकीय आणि तत्सम शाखा | २०० | १ वर्ष / २ वर्ष | रू. २०,०००/- (रू. ४०,०००/-२ वर्षांकरीता) |
| (क) | सनदी लेखापाल,व्यवस्थापन, विधी इत्यादी | २०० | १ वर्ष / २ वर्ष | रू. २०,०००/- (रू. ४०,०००/-२ वर्षांकरीता) |
| ६. | इयत्ता १० वी नापास विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग | १००० | १० महिने | रू. ४,०००/- |
| ७. | इयत्ता १२ वी नापास विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग | १००० | १० महिने | रू. ५,०००/- |

**२०) उर्दू घराकरीता सहाय्यक अनुदान:**

महाराष्ट्रामध्ये उर्दू भाषेची वाङमयीन प्रगती, मराठी व उर्दू भाषेमधील लेखक, कवी, विचारवंत इ. मध्ये सर्जनशील विचारांची देवाणघेवाण होऊन उर्दू भाषेचा वाङमयीन विकास व्हावा व उर्दू भाषेच्या समृध्दीसाठी उर्दू घराच्या रुपाने एक ठिकाण असावे या

उद्देशाने राज्यातील काही उर्दू भाषिक बहुल शहरामध्ये उर्दू घर उभारण्याचे धोरण शासन निर्णय दि.०६.०५.२०२२ अन्वये विहित करण्यात आले आहे. यानुसार अन्य काही अटींच्या अधीन राहून सन-२०११ च्या जनगणनेआधारे १.२५ लाखापेक्षा अधिक उर्दू भाषिक लोकसंख्या असलेल्या भागात जागेच्या उपलब्धतेनुसार उर्दू घर बांधण्याचे धोरण विहित करण्यात आले आहे.सद्य:स्थितीत नांदेड, मालेगाव, जि.नाशिक आणि सोलापूर येथील उर्दू घर कार्यान्वित करण्यात आले आहे. नागपूर येथील उर्दू घराचे काम पूर्ण झाले असून असून सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर येथील उर्दू घराचे काम सुरु आहे.

**१) योजनेकरीता अर्थसंकल्पीय तरतुद (सन २०२६-२७):- रूपये ४.०० कोटी**.

**२)** भौतिक उद्दिष्ट: **५** उर्दू घर

**३)** योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा:- संबंधित जिल्हाधिकारी व अल्पसंख्याक विकास विभाग.

### २१) अल्पसंख्याक लोकसमुहाकरीता धर्मक्षेत्र व परिसर विकास आराखडा योजना:-

नियोजन विभागाच्या दि.०४.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील तीर्थक्षेत्र/ पर्यटन विकास आराखडयाची अंमलबजावणी सुयोग्यरित्या व एकसंघरित्या करण्यासाठी सुनिश्चित धोरण आखण्यात आलेले आहे. दि.०२.०२.२०२२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये अल्पसंख्याक लोकसमुहाकरीता धर्मक्षेत्राचा विकास आराखडा राबविण्याचा विषय अल्पसंख्याक विकास विभागाच्या अखत्यारित देण्यात आलेला आहे. त्यानुसार दि.१७.०२.२०२४ अन्वये अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सदर योजनेसाठी धोरण निश्चित करण्यात आले आहेत.

**१) योजनेकरीता अर्थसंकल्पिय तरतूद (सन २०२६-२७):- रु. २७.०० कोटी.**

२) भौतिक उद्दिष्ट :- **२ धर्मक्षेत्र विकास.**

३) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा : संबंधित जिल्हाधिकारी व अल्पसंख्याक विकास विभाग.

**२२) मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र जलद विकास कार्यक्रम २०१८ अंतर्गत महिला बचत गट निर्माण करुन त्यामधील महिला सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणेबाबत योजना :-** मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र जलद विकास कार्यक्रम २०१८ या कार्यक्रमांतर्गत औरंगाबाद, नागपूर, अमरावती, लातूर, चंद्रपूर, बीड, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, जालना या १४ जिल्हयामध्ये प्रति जिल्हा २०० या प्रमाणे २८०० अल्पसंख्याक महिला बचतगट महिला आर्थिक विकास महामंडळ यांचे मार्फत निर्माण करणे. या विभागात सदयास्थितीमध्ये कार्यरत व नव्याने निर्माण होणारे बचतगट यामधून अंदाजे १५०० सदस्यांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याचा शासन निर्णय ०७, ऑगस्ट, २०१९ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

**कालावधी:**- सदर प्रशिक्षण कार्यक्रम दोन वर्षा करीता निश्चित करण्यात आला आहे.

**१) योजनेकरीता अर्थसंकल्पीय तरतुद (सन २०२६-२७):- रूपये रु. ३.०० कोटी.**

### २३) राज्यातील अल्पसंख्याक समुहातील महिला व युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे बाबत.

**योजना:**- राज्यातील अल्पसंख्याक समुहातील महिला व युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी प्राप्त पहावी या उदेशाने शासन निर्णय दि.२६, ऑगस्ट २०१९ अन्वये शासन मान्यता देण्यात आली आहे. या योजने अंतर्गत अल्पसंख्याक समुहातील वय वर्ष १५ ते ४५ या वयोगटातील युवक व महिलांना खाजगी प्रशिक्षण संस्थेव्दारे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराक्षम करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**१) योजनेकरीता अर्थसंकल्पीय तरतुद (सन २०२६-२७):- रु. १००.०० कोटी**

### २४) पोलीस भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग:-

राज्यातील अल्पसंख्याक समुहातील उमेदवारांच्या पोलीस भरतीच्या प्रमाणात वाढ व्हावी याकरिता शासन निर्णय दिनांक २७/०७/२००९ अन्वये पोलीस भरती पूर्व परीक्षा योजना राबविण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम दोन महिने व अनिवासी स्वरुपाचा होता. या योजनेस मिळणारा प्रतिसाद वाढावा यासाठी उमेदवारांना निवासाची सोय उपलब्ध झाल्यास प्रशिक्षण तसेच मैदानी परिक्षांचा तसेच लेखी परीक्षांचा सराव करता येईल व त्यामधून योजनेस अपेक्षित यश प्राप्त होईल, याकरिता सदर योजना निवासी स्वरुपात राबविण्याचा, तसेच योजनेचा कालावधी दोन महिन्याऐवजी तीन महिन्याचा करण्याबाबतचा निर्णय दि.१७ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

१) **योजनेकरीता अर्थसंकल्पीय तरतुद (सन २०२६-२७):- ३.०० कोटी.**

# जेंडर बजेटिंग

| अ क्र | योजना | लाभार्थी संख्या | | | योजना निहाय तरतुद (रु.हजारात) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | शहरातील अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहाकरिता सहायक अनुदान (२२३५A१४२) | ७५० (विद्यार्थी) | १००० (विद्यार्थी) | १२०० (विद्यार्थी) | १५२३२०.०० | १४००००.०० | ३००००.०० |
| २ | स्वयंसहाय्यता (महिलां करीता) गटाकरीता योजना (२२३५ A १६९) | ३८०० बचतगट | ४७५२ बचतगट | ४७५२ बचतगट | ४९०००.०० | ४९०००.०० | १२००००.०० |

(*रकाना क्र. **३,४,५,६,७** व **८** येथील आकडेवारी उपलब्ध असलेल्या माहिती आधारे एकत्रितरित्या (विद्यार्थी/ विद्यार्थीनी) नमूद केली आहे )

# तक्ता - २

# Table - २

## २) वित्तीय आवश्यकता

## ii) Financial Requirement

## २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| | राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पसंख्याक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना | १७४९४ | ५७७०५७३ | ५७८८०६७ | ३८०५७ | ८९६४९९८ | ९००३०५५ |
| | **एकूण** | १७४९४ | ५७७०५७३ | ५७८८०६७ | ३८०५७ | ८९६४९९८ | ९००३०५५ |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष | | | | | | |
| झेडई-०१, | २२३५ | १७४९४ | ५७७०५७३ | ५७८८०६७ | ३८०५७ | ८९६४९९८ | ९००३०५५ |
| | **एकूण** | **१७४९४** | **५७७०५७३** | **५७८८०६७** | **३८०५७** | **८९६४९९८** | **९००३०५५** |

## ii) Financial Requirements

(रू. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate २०२६-२७ | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| ५५९९१ | ११९१९९३८ | ११२४७९२९ | ३८७७९ | ९२८९९२० | ९३२८६९९ | Various schemes being implemented by the Minorities Development Department for the overall development of minorities in the State |
| ५५९९१ | ११९१९९३८ | ११२४७९२९ | ३८७७९ | ९२८९९२० | ९३२८६९९ | **Total** |
| | | | | | | B- Source of Finance |
| | | | | | | Demand No. Major Head |
| ५५९९१ | ११९१९९३८ | ११२४७९२९ | ३८७७९ | ९२८९९२० | ९३२८६९९ | ZE – 01, 2235 |
| **५५९९१** | **११९१९९३८** | **११२४७९२९** | **३८७७९** | **९२८९९२०** | **९३२८६९९** | **Total** |

# कार्यक्रम क्रमांक (३)

## मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

**१) महामंडळाची स्थापना:-** दि. २८ सप्टेंबर, २००० रोजी कंपनी कायदा १९५६ अंतर्गत करण्यात आलेली आहे.

**२) महामंडळाची उद्दिष्टे** १) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज योजना, प्रशिक्षण योजना राबविणे.

२) अल्पसंख्याक आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य देणे.

३) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी - विद्यार्थीनींना शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.

४) व्यवसाय / व्होकेशनल ट्रेनिंग देणे.

५) अल्पसंख्याक समूहातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी सूक्ष्म पतपुरवठा योजना राबविणे.

**३) महामंडळाचे भागभांडवल :-**१) महामंडळाचे प्राधिकृत भागभांडवल रु. ७०० कोटी आहे.

२) आतापर्यंत शासनाने महामंडळास रु.६७१.५९१ कोटी इतके भागभांडवल अदा केले आहे.

**४) महामंडळ राबवित असलेल्या विविध योजना :-**

### अ) राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या योजना:-

१) **<u>उन्नती मुदत कर्ज योजनेची</u> पात्रता** :-

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येणारी योजना.
उन्नती मुदत कर्ज योजना :-

**१.** अर्जदार हा अल्पसंख्याक (**मुस्लीम, बौध्द, शीख, पारसी, ख्रिश्चन, जैन व ज्यू** ) समाजातील असावा.

**२.** अर्जदार व जामीनदार **महाराष्ट्राचा मूळ रहिवाशी** असावा.

**३.** अर्जदार व जामीनदार **साक्षर** असणे आवश्यक आहे.

| अ. क्र | तपशील | Credit Line-१ | Credit Line-2 |
|---|---|---|---|
| ४. | **कर्ज मर्यादा -** | रु. २० लाखापर्यंत | रु. ३० लाखापर्यंत |
| ५. | **व्याज दर**<br><br>**(द.सा.द.शे.)** | ६% + २% हमी शुल्क<br><br>= २% | ८% +२% हमी शुल्क = १०% - पु. (Men)<br><br>६%+२%हमी शुल्क = २%-म. (Women) |
| ६. | **कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा -** | शहरी भागासाठी रु. १,२०,०००/- पेक्षा कमी, ग्रामीण भागासाठी रु.९८,०००/-पेक्षा कमी | रु. ८.०० लाखापर्यंत. |

**७. अर्जदाराचा सहभाग**: - ९५% कर्ज, ५% स्वगुंतवणुक

**८. कर्ज परतफेड कालावधी**: कर्ज वितरणानंतर पुढील ३ महिन्यापासून पुढील ५ वर्षापर्यंत.

**९. अर्जदाराचे वय**: - १८ ते ६० वर्षापर्यंत.

**१०.जामीनदाराचे वय**: - मालमत्ताधारक जामीनदारकरिता वय मर्यादा नाही. अर्जदार हा जामीनदार होऊ शकतो.

**११. विमा संरक्षण**:- एकूण कर्ज रक्कमेच्या १.५ % रक्कम एकदाच विम्याचा हप्ता म्हणून कापून घेण्यात येईल.
(नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या अर्जदाराचा मृत्यु झाल्यास त्याला हे विमा संरक्षण असेल)

**२) शैक्षणिक कर्ज योजना** :-

**अ)** राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येणारी योजना.

**डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना :-**

| अ. क्र. | तपशील | Credit Line-१ | Credit Line-२ |
|---|---|---|---|
| १. | कर्ज मर्यादा | १.रु.२०/-लाखापर्यंत (भारतातील शिक्षणाकरिता)<br>२.रु.३०/-लाखापर्यंत (परदेशातील शिक्षणाकरिता) | १. रु.२०/-लाखापर्यंत (भारतातील शिक्षणाकरिता)<br>२. रु.३०/-लाखापर्यंत (परदेशातील शिक्षणाकरिता) |
| २. | व्याज दर (द.सा.द.शे.) | ३% + २% = ५% | ८% + २% = १०% पु. (Men)<br>५% + २% = ७% स्त्री (Women) |
| ३. | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा | शहरी भागासाठी रु.१,२०,०००/- पेक्षा कमी.<br>ग्रामीण भागासाठी<br>रु.९८०००/- पेक्षा कमी. | विद्यार्थ्यांच्या पालकांच्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्नावरील मर्यादा रु.८.००/ लाखापर्यंत. |

४. परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यापासून पुढील ५ वर्ष.

५. विद्यार्थ्यांचे वय - १६ ते ३२ वर्षे

**३) सुक्ष्म पतपुरवठा योजना:-**

- **उद्देश**:-

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत सुक्ष्म पतपुरवठा योजना राबविण्यात येते. महिला आर्थिक विकास महामंडळ, राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती अभियान (National Urban Livelihood Mission (NULM) तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (Maharashtra State Rural Livelihood Mission (MSRLM) या नामांकित संस्थामार्फत अल्पसंख्याक महिला व पुरुष बचत गटांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करुन देणे, हा उद्देश आहे.

- **कर्ज योजनेचे स्वरुप**:

महिला आर्थिक विकास महामंडळ, राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती अभियान (National Urban Livelihood Mission (NULM) तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (Maharashtra State Rural Livelihood Mission (MSRLM) या नामांकित संस्थामार्फत अल्पसंख्याक स्वयं सहाय्यता बचत गटांची यापूर्वी स्थापना झालेली असेल किंवा पुढे होईल त्याप्रमाणे महिला आर्थिक विकास महामंडळाने/इतर नामांकित संस्थांनी त्या बचत गटांना पहिल्या व दुसऱ्या टप्प्यासाठी कर्जाकरिता बँकांशी जोडणी करुन दिलेली असेल व पहिल्या व दुसऱ्या टप्प्याच्या कर्जाची परतफेड ज्या बचत गटांनी यापूर्वी केलेली असेल तो बचत गट मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत तिसऱ्या टप्प्याच्या रु. २० लाख पर्यन्त (महामंडळाचा हिस्सा ९५% कर्ज, ५% बचत गटाचा हिस्सा.) कर्ज देण्यासाठी पात्र राहील.

- **कर्ज योजनेची माहिती** :

| अ क्र | तपशील | Credit Line-१ | Credit Line-2 |
|---|---|---|---|
| 1 | **कर्ज मर्यादा -** | प्रत्येकी सदस्य रु. १ लाख असे एका गटास रु.२० लाखापर्यंत (२० सभासद) | प्रत्येकी सदस्य रु.१.५० लाख असे एका गटास रु. ३० लाखापर्यंत (२० सभासद) |
| 2 | **व्याज दर(द.सा.द.शे.)** | ७ % + २ % हमी शुल्क = ९ % | १० % + २० % हमी शुल्क = १२ % - पुरुष (Male)<br>८ %+ २% हमी शुल्क = १० %- महिला (Female) |
| 3 | **कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा -** | शहरी भागासाठी रु. १,२०,०००/- पेक्षा कमी, ग्रामीण भागासाठी रु.९८,०००/-पेक्षा कमी | रु. ८.०० लाखापर्यंत. |

- **कर्ज मिळण्यासाठी पात्रता** : महिला आर्थिक विकास महामंडळासह इतर नामांकित संस्थांमार्फत स्थापन करण्यात आलेले अल्पसंख्याक बहुल बचत गट.
- **बचत गट**: बचत गट केवळ या महामंडळाकडून कर्ज मिळण्यास पात्र राहतील.
- **कर्ज परतफेड कालावधी**: कर्ज वितरणानंतर पुढील ३ महिन्यापासून पुढील ३वर्ष कालावधीच्या आत.
- **बचत गटांचा सहभाग**: ९५% कर्ज, ५% बचत गटाचा हिस्सा.
- **बचत गटातील सभासद संख्या**: कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० सभासद.
- **अल्पसंख्याक सहभाग** : बचत गटातील ७०% पेक्षा अधिक सभासद अल्पसंख्याक समाजातील असणे आवश्यक.

**ब) राज्य शासनामार्फत भाग भांडवल स्वरुपात प्राप्त होणा-या निधीतून राबविण्यात येणा-या योजना -**

**१) मौलाना आज़ाद शैक्षणिक कर्ज योजना** :-

१. कर्ज मर्यादा - रु.५.००/- लाखापर्यंत (भारतातील शिक्षणाकरिता )
२. व्याज दर - ३%
३. १००% कर्ज
४. परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यापासून पुढील ५ वर्ष.
५. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा - विद्यार्थ्यांच्या पालकांच्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्नावरील मर्यादा रु.८.०० लाखापर्यंत.
६. विद्यार्थ्यांचे वय - १६ ते ३२ वर्षे

**: प्रोत्साहनात्मक कार्यक्रम:**

❖ **अल्पसंख्याक स्वयंरोजगार जनजागृती कार्यक्रम**

महामंडळामार्फत राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त विभाग, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने तसेच राज्य शासनामार्फत भाग भांडवल स्वरुपात प्राप्त होणा-या निधीतून राबविण्यात येणा-या सर्व योजनांबाबतची माहिती अल्पसंख्याक समाजाला सदर कार्यक्रमामध्ये देण्यात येते. सदर कार्यक्रम १ दिवसाचा असतो. सदर कार्यक्रम NMFDC किंवा महामंडळामार्फत आयोजित केल्यानुसार राहतो.

❖ **व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम**

सदरील योजना प्रामुख्याने NMFDC यांच्या सहकार्याने राबविण्यात येते. अल्पसंख्याक समाजातील व्यक्तीना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ते कौशल्य प्रशिक्षण या कार्यक्रमातून देण्यात येते. सदर कार्यक्रमाचा कालावधी जास्तीत जास्त ६ महिने इतका असतो. सदर योजना NMFDC मार्फत मंजुरी मिळाल्यानुसार राबविण्यात येते.

❖ **महिला समृध्दी योजना प्रशिक्षण**

सदरील योजना राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येते. सदर योजनेची अंमलबजावणी राज्य वाहिनीकृत यंत्रणा (महामंडळ) किंवा NGO मार्फत करण्यात येते. महिला समृध्दी योजनेतंर्गत २० महिलांना त्यांच्या सोई/आवश्यकतेनुसार ६ महिन्याचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. NMDFC मार्फत मंजुरी मिळाल्यानुसार सदरील योजना राबविण्यात येते.

❖ **प्रदर्शन कार्यक्रम (Exhibition)**

सदरील प्रदर्शन कार्यक्रम राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येतो. अल्पसंख्याक समाजातील व्यक्तीना वस्तूची विक्री (स्वनिर्मित किंवा महिला बचत गट/मुदत कर्जाचा लाभार्थी ज्या वस्तू विकतात अशा) करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. एका प्रदर्शन कार्यक्रमाचा कालावधी १५ दिवसांचा असून त्यामध्ये अल्पसंख्याक समाजातील ८० व्यक्तीसाठी ४० स्टॉल विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात येतात. सदरील कार्यक्रम NMDFC कडून मिळालेल्या सूचनानुसार राबविण्यात येतो.

**महामंडळाच्या योजनांसाठी आवश्यक ती कागदपत्रे:-**

**उन्नती मुदत कर्ज योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :-**

**अर्जदार :-**

१. आधारकार्ड
२. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
३. अल्पसंख्याक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा जात प्रमाणपत्र)
४. तहसिलदार यांनी निर्गमित केलेले उत्पन्न प्रमाणपत्र (मुळ प्रत)
५. जन्म दिनांकाचा पुरावा

६. शिधापत्रिका (रेशन कार्ड)
७. GST नंबर धारक कोटेशन प्रमाणपत्र (मूळ प्रत)
८. व्यवसायाच्या जागेचे गुमास्ता लायसन /शॉप अक्ट लायसन्स व विद्युत बील
९. राष्ट्रीयकृत बँक पासबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत
१० राष्ट्रीयकृत बँकेचे (२0 Post Dated Cheque व ECS फॉर्म ) धनादेश
११ पॅन कार्ड
१२. कुटूंबातील व्यक्तीने महामंडळाकडून कर्ज न घेतल्याचे प्रतिज्ञापत्र घ्यावे.

**जामीनदार** :-

**अ. मालमत्ताधारक जामीनदार**
१. आधारकार्ड
२. सक्षम अधिका-याचा ७/१२, ६ड, ८अ उतारा व मालमत्ता नोंदणीपत्रक (पीआर कार्ड) (मूळ प्रत)
३. दुय्यम निबंधकाचे मालमत्तेबाबत दिलेले मुल्यांकन पत्र. (मूळ प्रत)

**किंवा**

**ब ) विमाधारक (LIC) जामीनदार असेल तर** :-
१. अर्जावरील जामीनदाराच्या पासपोर्ट साईज रंगीत फोटोवर जामीनदाराची क्रॉस स्वाक्षरी असणे आवश्यक.
२. आधारकार्डची झेरॉक्स
३. मूळ पॉलिसी प्रमाणपत्र (LIC)
४. पॉलिसी ही कर्ज रकमेच्या दुप्पट असावी आणि पॉलिसीच्या संपूर्ण कालावधीतील अर्ध्या रकमेचे हप्ते भरणा केलेले असणे आवश्यक आहे.
५. एलआयसी हप्ते भरणा केलेले विवरणपत्र जोडणे आवश्यक.

**किंवा**

**क ) मुदती ठेवीदार (FD) असणारा जामीनदार असेल तर** :-
१. अर्जावरील जामीनदाराच्या पासपोर्ट साईज रंगीत फोटोवर जामीनदाराची क्रॉस स्वाक्षरी असणे आवश्यक.
२. आधारकार्डची झेरॉक्स
३. मूळ मुदती ठेव प्रमाणपत्र (FD) ( कर्ज रकमेच्या समतुल्य FD असावी )

**अर्जदाराकरिता विशेष टीप :- अर्जदाराच्या कुटूंबातील व्यक्तीने यापुर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेत कर्ज घेतले असल्यास/थकबाकी असल्यास त्याची माहिती संबंधीत जिल्हा व्यवस्थापक यांना देणे बंधनकारक राहील.थकबाकी असल्यास अपात्र ठरेल.**

**शैक्षणिक कर्ज योजनांसाठी ऑनलाईन फॉर्म/अर्ज भरण्यासाठी अर्जदाराकडे लागणारी कागदपत्रे.**

A. **अर्जदाराशी संबंधीत**:-
१. पासपोर्ट साईज रंगीत फोटो.
२. आधारकार्ड क्रमांक
३. अधिवास प्रमाणपत्र (Domicile)
४. अर्जदाराचा मोबाईल क्रमांक
५. बोनाफाईड
६. फी स्ट्रक्चर
७. ईमेल आयडी
८. बँक पासबुक
९. शैक्षणिक संस्थेची संपूर्ण माहिती.
१०. अल्पसंख्याक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला (जात प्रमाणपत्र))

**B. सहअर्जदाराशी संबंधीत**:-
१. पासपोर्ट साईज रंगीत फोटो
२. आधारकार्ड क्रमांक
३. उत्पन्न दाखला
४. मोबाईल क्रमांक

५. सहअर्जदार पॉलिसी किंवा मुदती ठेव जामीनदार असेल तर पॉलिसी/मुदती ठेव क्रमांक

६. कुटूंबातील व्यक्तीने महामंडळाकडून कर्ज न घेतल्याचे प्रतिज्ञापत्र घ्यावे.

C. **जामीनदाराशी संबंधीत**:-

१. पासपोर्ट साईज रंगीत फोटो

२. आधारकार्ड क्रमांक

३. मोबाईल क्रमांक

४. पॅनकार्ड क्रमांक

५. उत्पन्नाबाबत माहिती

६. जामीनदार ज्या प्रकारचे असतील त्या प्रकारानुसार आवश्यक असलेली संपूर्ण माहिती.

अर्जदाराने ऑनलाईन फॉर्म संपूर्ण भरुन फॉर्मची प्रिंट काढून त्यासोबत खालील दिलेली कागदपत्रे जोडावीत. या कागदापत्रांच्या संचाच्या दोन झेरॉक्स प्रती काढावीत. मूळ फाईल व एक झेरॉक्स (फाईल कव्हरसह) अर्जदार किंवा सहअर्जदारांनी प्रत्यक्ष येवून जिल्हा कार्यालयात जमा करावी व एक झेरॉक्स प्रतीच्या संचावर जिल्हा व्यवस्थापकाची सही घेवून स्थळप्रत म्हणून (ओसी) आपल्याकडे ठेवावी.

**जिल्हा कार्यालयामध्ये फाईल जमा करताना फाईलमध्ये खालील क्रमाने आवश्यक कागदपत्रे जोडावीत**. (पार्ट-१)

A. **अर्जदाराशी संबंधीत**:-

१. अर्जावरील अर्ज (Application) (प्रतिज्ञापत्र) देणे.

२. ऑनलाईन अर्जावरील प्रिंटेड प्रत- (त्यावर अर्जदाराचा पासपोर्ट साईज रंगीत फोटो चिकटवुन फोटोवर अर्जदारा क्रॉस स्वाक्षरी करणे आवश्यक).

३. आधारकार्डची झेरॉक्स प्रत.

४. अधिवास प्रमाणपत्र (Domiciled)

५. संस्थेने दिलेले बोनाफाईड सर्टिफिकेट (मूळप्रत).

६. संस्थेच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे नाव नमुद करुन संस्थेकडून आकारण्यात येणा-या वर्षनिहाय फी बाबत दिलेली माहिती (फी स्ट्रक्चरची) मूळ प्रतीत (प्राचार्याची सही व शिक्का असणे आवश्यक.)

७. Fee Concession/Free ship Information नमुना पत्र जोडणे आवश्यक.

८. महाविद्यालयामध्ये वस्तीगृहाची सोय नसेल व अर्जदार खाजगी खोलीत भाडयाने राहत असल्यास भाडे करारनामा,जागा मालकाचा मालकी पुरावा, मालकाचे आधारकार्ड व इलेक्ट्रीक बिलाची झेरॉक्स प्रत.

९. शाळा सोडल्याचा दाखल्याची झेरॉक्स प्रत (L.C. /T.C.)जन्म नोंदीचा दाखला.

१०. राष्ट्रीयकृत बँक पासबुकची झेरॉक्स प्रत ११. शिधापत्रिका (रेशन कार्ड )

B. **सहअर्जदाराशी संबंधीत**:-

१. अर्जावरील सहअर्जदाराच्या पासपोर्ट साईज रंगीत फोटोवर सहअर्जदाराची क्रॉस स्वाक्षरी असणे आवश्यक.

२. आधारकार्डची झेरॉक्स ३. उत्पन्न दाखल्याची (मूळप्रत)

C. **जामीनदाराशी संबंधीत**:-

**मालमत्ताधारक जामीनदार असेल तर** :-

१. अर्जावरील जामीनदाराच्या पासपोर्ट साईज रंगीत फोटोवर जामीनदाराची क्रॉस स्वाक्षरी असणे आवश्यक.

२. आधारकार्डची झेरॉक्स

३. मालमत्तेबाबत सक्षम अधिका-याचे दिलेल्या दाखल्याची (जमिनीचा ७/१२/प्रॉपर्टी/ रजिस्टर/ नमुना-८) मूळप्रत.

४. दुय्यम निबंधकाचे मालमत्तेबाबत दिलेल्या मुल्यांकन पत्राची (मूळप्रत).

**किंवा**

**शासकीय/निमशासकीय/शासनाची महामंडळे/शासन अनुदानित शाळा/केंद्रशासन किंवा राज्य शासनाचे उपक्रम मध्ये नोकरदार व्यक्ती जामीनदार असेल तर**.

१. अर्जावरील जामीनदाराच्या पासपोर्ट साईज रंगीत फोटोवर जामीनदाराची क्रॉस स्वाक्षरी असणे आवश्यक.

२. आधारकार्डची झेरॉक्स 3. कार्यालयाच्या ओळखपत्राची झेरॉक्स 4. पॅनकार्ड झेरॉक्स.

५. पगारपत्रक (पगारपत्रकावर संबंधीत कार्यालयाचा सही व शिक्का सेवानिवृत्तीचा दिनांक आवश्यक) जामीनदार राज्य व केंद्र शासनात नोकरदार असल्यास त्यांची सेवा अर्जदाराचे शिक्षण संपल्यानंतर 6 वर्ष असणे आवश्यक आहे.

**किंवा**

**<u>विमाधारक (LIC) जामीनदार असेल तर</u>** :-

१. अर्जावरील जामीनदाराच्या पासपोर्ट साईज रंगीत फोटोवर जामीनदाराची क्रॉस स्वाक्षरी असणे आवश्यक.

२. आधारकार्डची झेरॉक्स 3. मूळ पॉलिसी प्रमाणपत्र (LIC)

4. पॉलिसी ही कर्ज रकमेच्या दुप्पट असावी आणि पॉलिसीच्या संपूर्ण कालावधीतील अर्ध्या रकमेचे हप्ते भरणा केलेले असणे आवश्यक आहे. 5. एलआयसी हप्ते भरणा केलेले विवरणपत्र जोडणे आवश्यक.

**किंवा**

**<u>मुदती ठेवीदार (FD) असणारा जामीनदार असेल तर</u>** :-

१. अर्जावरील जामीनदाराच्या पासपोर्ट साईज रंगीत फोटोवर जामीनदाराची क्रॉस स्वाक्षरी असणे आवश्यक.

२. आधारकार्डची झेरॉक्स 3. मूळ मुदती ठेव प्रमाणपत्र (FD)

**<u>अर्जदाराकरिता विशेष टीप</u>** :- अर्जदाराच्या कुटूंबातील व्यक्तीने यापुर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेत कर्ज घेतले असल्यास/थकबाकी असल्यास त्याची माहिती संबंधीत जिल्हा व्यवस्थापक यांना देणे बंधनकारक राहील.

- **<u>सक्षम पतपुरवठा योजनेसाठी आवश्यक ती कागदपत्रे :</u>**
- **<u>अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे ( Part-१)</u>**

  १. विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक साक्षांकित कागदपत्रांच्या दोन प्रती.

  २. बचत गटातील ७०% पेक्षा अधिक सभासद अल्पसंख्याक समाजातील असणे आवश्यक राहील. त्यांचा अल्पसंख्याक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा जात प्रमाणपत्र किंवा ग्रामपंचायतीचा दाखला किंवा तलाठी दाखला किंवा स्वयंघोषित प्रमाणपत्र (साध्या पेपरवर) (यापैकी *कोणतेही एक*)

  ३. **प्रत्येक सभासदाचा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा पुरावा** : अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

  ४. **सर्व सभासंदांचे ओळखपत्र** : आधार कार्ड

  ५. **सर्व सभासदांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र** : कुटुंब प्रमुखाच्या नावे तहसिलदार यांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला किंवा BPL / SECC यादीमध्ये नाव समाविष्ट असणे किंवा MAVIM /NULM/MSRLM यांच्या समन्वय अधिकाऱ्यामार्फत सदर सदस्य दारिद्रयरेषेखाली असल्याचे प्रमाणपत्र.

  ६. कमीतकमी एका सदस्यांची समतुल मुल्याची मालमत्ता असणे आवश्यक.

  ७. अध्यक्ष /सचिव यांचे सविस्तर परिचयपत्र व बचत गटाच्या सामजिक कार्याचा उल्लेख.

  ८. बचत गटातील सदस्यांच्या नावाची यादी (नाव, पत्ता, वय, जात व करावयाच्या व्यवसाय, भ्रमणध्वनी क्रमांक)

  ९. बचत गट प्रमुखाचा थोडक्यात परिचय

  १०. सक्षम अधिका-याचा ७/१२, ६ड, ८अ उतारा व मालमत्ता नोंदणीपत्रक (पीआर कार्ड) (मूळ प्रत)

- **कर्ज मंजुरीनंतर सादर करावयाची कागदपत्रे (वैधानिक दस्तऐवजासोबत) (Part -II )**

  १. बचत गटाच्या बँकेच्या पासबुकाची झेरॉक्स.

  २. मागील ६ महिन्याच्या बचत गटाच्या इतिवृत्ताची छायांकित प्रत.

  ३. बचत गटातील सभासदांचे रंगीत फोटो.

  ४. बचत गटाच्या मागील दोन / तीन वर्षाच्या आर्थिक व्यवहाराचा जमाखर्चाचा तपशील.

  ५. विविध शासकीय विभागाकडून बचत गटास मिळणाऱ्या आर्थिक मदतीची माहिती.

  ६. बँक / वित्तीय संस्था यांच्याकडे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यावरील कर्जाची परतफेड केल्याबाबतचे ना देय प्रमाणपत्र.

  ७. सर्व सभासदांचे बेबाकी प्रमाणपत्र :- महामंडळाने विहित केलेल्या नमुन्यात अर्जदाराचे खाते असलेल्या बँकेचे/वित्तीय संस्थेचे कोणत्याही प्रकारचे कर्ज / थकबाकी नसल्याचे बेबाकी प्रमाणपत्र व इतर कोणत्याही बँकेचे / वित्तीय संस्थेचे कर्ज नसल्याबाबतचे मुळ प्रतीतील शपथपत्र.

  ८. विहित नमुन्यातील वैधानिक दस्तऐवज (Legal Agreement) रजिस्टर नोटरी करून घ्यावे.

  ९. कर्ज वसुलीचे आगावू दिनांकित राष्ट्रीयकृत बँकेचे धनादेश (२0 Post Dated Cheque / ECS) घ्यावे.

  १०. संबंधीत मालमत्तेवर बोजा चढलेला असावा.

# जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळ, मुंबई

❖ **महामंडळाची स्थापना**

राज्यातील जैन समाज हा अल्पसंख्याक समाज असून, त्यांच्या विविध पोटजाती प्रामुख्याने आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास अवस्थेत आहेत. जैन समाजातील युवक, महिला, विद्यार्थी, स्वयंरोजगार इच्छुक व्यक्ती तसेच लघुउद्योग करणाऱ्या घटकांना शासनाच्या विविध आर्थिक योजनांचा पुरेसा लाभ मिळत नव्हता. याअनुषंगाने जैन समाजाच्या सर्वांगीण सामाजिक व आर्थिक विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांकडून होत होती. त्यामुळे मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ तसेच इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या धर्तीवर जैन समाजासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. शासन निर्णय क्र. अविवि २०२४/प्र.क्र.२०४/कायासन-५, दिनांक ०४.१०.२०२४ अन्वये "जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ" स्थापन करण्यात आले. यानंतर शासन निर्णय दिनांक २५.०९.२०२५ नुसार महामंडळाचे नाव सुधारून "जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळ" असे करण्यात आले आहे.

❖ **मुख्यालय व प्रशासकीय व्यवस्था**

महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय व मुख्यालय मुंबई येथे असून, जिल्हा स्तरावरील कामकाज मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयांमार्फत पार पाडले जाणार आहे. त्यामुळे स्वतंत्र जिल्हा यंत्रणा उभारण्याचा खर्च टाळून विद्यमान पायाभूत सुविधांचा उपयोग करण्यात येणार आहे.

❖ **महामंडळाची उद्दिष्टे**

जैन समाजाच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी महामंडळाची खालील प्रमुख उद्दिष्टे आहेत –

- जैन समाजातील व्यक्तींना कमी व्याजदरात स्वयंरोजगारासाठी कर्ज उपलब्ध करणे.
- उद्योग, व्यापार, सेवा व शेतीपूरक व्यवसायासाठी वित्तपुरवठा.
- विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज व व्याज परतावा.
- महिलांसाठी स्वयंरोजगार व विशेष योजना.
- विधवा व परित्यक्ता महिलांसाठी आर्थिक सहाय्य.
- जैन तीर्थ, प्राचीन जैन ग्रंथ व वारसा यांचे संरक्षण व संवर्धन.
- कौशल्य विकास व प्रशिक्षणाद्वारे रोजगारनिर्मिती.

❖ **संचालक मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे.:-**

| अ.क्र. | पद | स्वरूप |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष – शासन नियुक्त पदाधिकारी | अध्यक्ष |
| २ | उपाध्यक्ष – शासन नियुक्त पदाधिकारी | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५ | सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६ | सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७ | सचिव, कौशल्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ८ | सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |

| अ.क्र. | पद | स्वरूप |
|---|---|---|
| ९ | सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १० | व्यवस्थापकीय संचालक / प्रतिनिधी, राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त निगम, नवी दिल्ली | सदस्य |
| ११ | सहसचिव / उपसचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १२ | आयुक्त, अल्पसंख्याक आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजीनगर | सदस्य |
| १३ | व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई | सदस्य |
| १४ | व्यवस्थापकीय संचालक, जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळ, मुंबई | सदस्य |
| १५ ते २१ | नामनिर्देशित अशासकीय सदस्य (७) | सदस्य |

❖ **जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळातील मंजूर पदे पुढीलप्रमाणे आहे.:-**

| अ.क्र. | पद | संख्या |
|---|---|---|
| १ | व्यवस्थापकीय संचालक | १ |
| २ | सह-व्यवस्थापकीय संचालक | १ |
| ३ | मुख्य वित्तीय अधिकारी | १ |
| ४ | व्यवस्थापक | २ |
| ५ | लेखापाल | २ |
| ६ | लिपिक-टंकलेखक | ४ |
| ७ | वाहनचालक | १ |
| ८ | शिपाई | २ |
| **एकूण** | | **१५** |

❖ **महामंडळाच्या योजना**

**महामंडळामार्फत खालील प्रमुख आर्थिक योजना राबविण्यात येणार आहेत –**

**(अ) बीज भांडवल योजनाउद्देश:**

नवउद्योजकांना बँकेकडून कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक भांडवलाचा अंश शासनामार्फत उपलब्ध करून देणे.

**योजना स्वरूप :**

- राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा अग्रणी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांमार्फत योजना राबविण्यात येईल.
- प्रकल्प खर्चातील **२५% महामंडळामार्फत** व **७५% बँकेमार्फत** उपलब्ध होईल.
- प्रकल्पाची कमाल मर्यादा **₹५.०० लाख**.
- लाभार्थ्यास व्याज दर ४%.
- परतफेड कालावधी **५ वर्षे**.

**(ब) थेट कर्ज योजना**

उद्देश :

**जैन समाजातील बेरोजगार युवक, महिला व लघुउद्योजकांना थेट आर्थिक सहाय्य देणे.**

**तपशील :**

- शासनाकडून प्राप्त भागभांडवलातून महामंडळ थेट कर्ज देईल.
- **लाभार्थ्यास ₹१.०० लाखपर्यंत थेट कर्ज.**
- लाभार्थ्याचा सहभाग – **शून्य**.
- **४८ समान मासिक हप्ते** नियमित भरल्यास **कोणतेही व्याज नाही**.
- थकबाकी असल्यास थकीत रकमेवर **४% व्याज** आकारण्यात येईल.

**(क) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनाउद्देश:**

स्वयंरोजगार, उद्योग व सेवा क्षेत्रासाठी घेतलेल्या बँक कर्जावरील व्याजाचा बोजा कमी करणे.

**तपशील :**

- बँक कर्ज मर्यादा – **₹१०.०० लाख**.
- लाभार्थ्याने हप्ते नियमित भरल्यास, बँकेने आकारलेले **१२% पर्यंत व्याज** महामंडळामार्फत थेट लाभार्थ्याच्या आधार संलग्न खात्यात जमा.
- योजना **PMFS / संगणकीकृत प्रणालीद्वारे** राबविली जाईल.
- एका कुटुंबातील फक्त **एका व्यक्तीस** लाभ.

**(ड) गट कर्ज व्याज परतावा योजना**

**उद्देश :**

जैन समाजातील उद्योजक गट, सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक संस्थांना (FPO) आर्थिक पाठबळ देणे.

**तपशील :**

- प्रति गट कर्ज मर्यादा – **₹१० लाख ते ₹५० लाख**.
- FPO गटांना **₹१० लाखापर्यंत व्याजमुक्त कर्ज**.
- गटाने नियमित हप्ते भरल्यास **१२% पर्यंत व कमाल ₹१५ लाखापर्यंत व्याज परतावा**.
- परतावा थेट बँक खात्यात

**(इ) शैक्षणिक कर्ज व्याज परतावा**

**उद्देश :**

जैन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत.

**तपशील :**

- देशांतर्गत शिक्षण – **₹१०.०० लाखपर्यंत कर्ज**
- परदेशी शिक्षण – **₹२०.०० लाखपर्यंत कर्ज**
- बँकेने आकारलेल्या कर्जावर **१२% पर्यंत व्याज परतावा** महामंडळामार्फत दिला जाईल.

**(ई) गृह कर्ज व्याज परतावा (PMAY)**

**उद्देश :**
स्वतःचे घर घेणाऱ्या जैन समाजातील कुटुंबांना सहाय्य.

**तपशील :**

- PMAY अंतर्गत गृहकर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांना
- ***८% पर्यंत व्याज परतावा*** महामंडळामार्फत देण्यात येईल.

**(उ) महिला स्वयं-सिद्धी योजना**

**उद्देश :**
जैन समाजातील बचत गटातील महिलांना उद्योग व उत्पादनासाठी प्रोत्साहन.

**तपशील :**

- बँक कर्ज मर्यादा – **₹५ ते ₹१० लाख**
- कर्जावरील **१२% पर्यंत व्याज परतावा** महामंडळामार्फत दिला जाईल

**(ऊ) कौशल्य विकास योजना**

- MSSDS धर्तीवर कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करणे.

❖ **लेखाशिर्ष (Accounting Heads)**

शासन निर्णय दिनांक **२५.०९.२०२५** नुसार जैन महामंडळासाठी खालील स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले आहेत.–

| उद्देश | लेखाशिर्ष | स्कीम कोड |
|---|---|---|
| महामंडळ प्रशासन खर्च | २२२५ G५३७ | ११११११९००५१ |
| योजनांसाठी अनुदान | २२२५ G५४६ | ११११११९००५२ |
| भागभांडवल | ४२२५ २१८८ | ११११११९००५३ |

❖ **आर्थिक तरतूद व भागभांडवल**

महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹५०.०० कोटी इतके असून, दरवर्षी त्यापैकी ₹५.०० कोटी विविध कर्ज योजनांसाठी मंजूर करण्यात येणार आहे. सन २०२५-२६ च्या नागपूर येथे पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये ₹५.०० कोटी इतके भागभांडवल उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

## २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate 2025-26 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | मौलाना आझाद अल्पसंख्याक व वित्तिय विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान | ० | २५०००० | २५०००० | ० | २५०००० | २५०००० |
| २ | राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाला भाग भांडवली अंशदान | ० | ३००० | ३००० | ० | ५००० | ५००० |
| ३ | जैन समाज अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाला भाग भांडवली अंशदान | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **०** | **२५३०००** | **२५३०००** | **०** | **२५५०००** | **२५५०००** |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष ४२३५ | | | | | | |
| झेडई-०२ | ४२३५०२३३ | ० | २५०००० | २५०००० | ० | २५०००० | २५०००० |
| | ४२३५०२४२ | ० | ३००० | ३००० | ० | ५००० | ५००० |
| | ४२२५२१८८ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **०** | **२५३०००** | **२५३०००** | **०** | **२५५०००** | **२५५०००** |

## ii) Financial Requirements

(रू. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates 2025-26 | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate 2026-27 | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| ० | १७५००० | १७५००० | ० | ५०००० | ५०००० | Maulana Azad Financial Development Corporation for Minorities |
| ० | १०५००० | १०५००० | ० | १००००० | १००००० | National Minorities Development and Financial Corporation |
| ० | ५०००० | ५०००० | ० | ३०००० | ३०००० | Jain Samaj Minorities Development and Financial Corporation |
| ० | ३३०००० | ३३०००० | ० | १८०००० | १८०००० | **Total** |
| | | | | | | B- Source of Finance |
| | | | | | | Demand No. Major Head |
| ० | ३३०००० | ३३०००० | ० | १८०००० | १८०००० | ZE - 02, 4235<br>4235 0233<br>4235 0242<br>4225 2188 |
| **०** | **३३००००** | **३३००००** | **०** | **१८००००** | **१८००००** | **Total** |

# कार्यक्रम क्रमांक (४)

# महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मंबई

दि. १७ फेब्रुवारी, १९९२ रोजी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची शासनाच्या धोरणात्मक निर्णयाद्वारे तीन वर्षाककरिता प्रथम स्थापना करण्यात आली होती तथापि दि. २१ जून, १९९५ रोजी राज्य अल्पसंख्याक आयोगाची ३ वर्षांची मुदत संपुष्टात आली. तद्नंतर राज्यातील धार्मिकक अल्पसंख्याकांच्या हितांचे संरक्षण व भारताच्या संविधानामध्ये अल्पसंख्याकांसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याकरिता राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या धर्तीवर शासन निर्णय क्र. एलएमएन/ प्र.क्र.-४९/३५, दि.४.२.२००० अन्वये राज्य अल्पसंख्याक आयोगाची पुर्नस्थापना करण्यात आली आणि महाराष्ट्र राज्य अल्पसख्याक आयोग अधिनियम २००४ (सन २००५ चा अधिनियम क्र.३१) दिनांक ८ ऑगस्ट २००५ च्या शासन अधिसूचनेन्वये आयोगास संविधानिक दर्जा प्रदान करण्यात आला आहे.राज्य शासनाने मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी, जैन आणि ज्यू या समुदायांना अल्पसंख्याक म्हणून घोषित केले आहे.

**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची रचना खालीलप्रमाणे आहे.**

- **अध्यक्ष**
- **उपाध्यक्ष**
- **अशासकीय सदस्य (नऊ)**
- **सदस्य सचिव**

**१) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे :-**

अ) अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी भारताच्या संविधानामध्ये आणि राज्य विधान मंडळाने मंजूर केलेल्या कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेल्या विविध संरक्षक उपाययोजनांच्या कार्यक्षमतेची तपासणी करणे.

ब) सर्व संरक्षक उपाययोजनांचे प्रभावी कार्यान्वयन व अंमलबजावणी होण्याची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने शिफारशी करणे;

क) संविधान आणि संसदेने आणि राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेले कायदे यात तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजना आणि अल्पसंख्याकासाठी असलेली राज्य शासनाची धोरणे
आणि योजना यांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवणे.

ड) अल्पसंख्याकाच्या बाबतीत होणारा भेदभाव टाळण्याच्या प्रश्नाबाबत अभ्यास, संशोधन विकास व विश्लेषण करणे,

इ) शासन, शासकीय उपक्रम, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या सेवेतील अल्पसंख्याकाच्या प्रतिनिधीत्वाचे वास्तविक निर्धारण करणे आणि प्रतिनिधीत्व अपुरे असल्यास त्याबाबतीत इच्छित पातळी गाठण्यासाठी उपाय सूचविणे,

ई) राज्यात जातीय ऐक्याची सुनिश्चिती करण्यासाठी, ते राखण्यासाठी आणि त्याला उत्तेजन देण्यासाठी शिफारशी करणे.

प) शासनाला विहित कालांतराने नियतकालिक अहवाल सादर करणे.

फ) अल्पसंख्याकांचे कल्याण आणि विकास यांच्या दृष्टीने, आयोगाच्या मते महत्वाची असेल अशा इतर कोणत्याही बाबींचा अभ्यास करणे आणि समुचित शिफारशी करणे.

ब) अल्पसंख्याकांच्या गा-हाण्याचा विचार करणे आणि त्यावर वेळोवेळी यथोचित उपाय सूचविणे.

भ) अल्पसंख्याकांना अधिकार व संरक्षक उपाययोजना यापासून वंचित ठेवण्या संबंधातील विनिर्दिष्ट तक्रारीमध्ये लक्ष घालणे आणि अशा बाबी समुचित प्राधिकरणाकडे नेणे,

ण) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी असलेल्या पंतप्रधानांच्या 15 कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन आणि पर्यवेक्षण करणे.

2) **महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान**.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, 2004 सुधारणा अधिनियम सन 2012 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 21 अन्वये आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहे.
सदर अधिनियमानुसार खालील अधिकार प्राप्त आहेत.

1) राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तपासणी करणे,

2) कोणत्याही दस्ताऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्मावणे.

3) शपथपत्रावर पुरावा स्विकारणे.

4) कोणत्याही कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिकक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत मागवणे आणि.

5) साक्षीदाराची आणि दस्तऐवजाची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे.

**3) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास प्राप्त तक्रारी संदर्भातील कार्यवाही.**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची स्थापना अल्पसंख्याकांचे हिताचे संरक्षण आणि त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाचे निवारण करण्याकरिता करण्यात आलेली आहे.

अल्पसंख्याक व्यक्तीवर पोलिस यंत्रणेकडून, प्रशासकीय यंत्रणेकडून होत असलेल्या अन्यायाबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. ज्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आहेत त्या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घेतला जातो आणि आवश्यकतेनुसार आयोगाकडून कार्यवाही करण्यात येते. तसेच शासनास त्या संदर्भात शिफारस करण्यात येते.

सन 2012 मध्ये राज्य अल्पसंख्याक आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहे. तद्नंतर ज्या प्रकरणामध्ये पोलिस विभागाकडून किंवा प्रशासकीय यंत्रणेकडून अन्याय झाला आहे अशा स्वरुपाच्या तक्रारीसंदर्भात आयोगाकडून सुनावणी आयोजित करण्यात येतात. सदर सुनावणी दरम्यान तक्रारदार आणि संबंधित यंत्रणा यांना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकूण घेण्यात येते तद्नंतर त्या प्रकरणासंबंधात आयोगाकडून योग्य त्या शिफारशी करण्यात येतात.

**४) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राज्यातील अल्पसंख्याकांकरिता पुढील कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत:-**

**अ) अल्पसंख्याक उमेदवारांसाठी शासकीय सेवा भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग** :- या योजनेंतर्गत नागरी पूर्व परीक्षा मार्गदर्शन कें द्र सुरु करण्यात आली आहेत. सदर योजना शासन निर्णय दिनांक १३.१२.२०२१ अन्वये अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येत आहे

**१) स्पर्धा परिक्षा पूर्व मार्गदर्शन केंद्र:-**

संघ लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणा-या स्पर्धा परिक्षांकरिता अल्पसंख्याक लोकसमूहातील निवडक १० होतकरू उमेदवारांना राज्य प्रशासकीय सेवा प्रशिक्षण संस्थेच्या मुंबई, कोल्हापूर, नागपूर व औरंगाबाद येथील केंद्रातून प्रशिक्षण देण्यात येते. पैकी मुंबई केंद्रास ११ महिन्यांचा प्रशिक्षणाचा कालावधी देण्यात आला असून कोल्हापूर, नागपूर आणि औरंगाबाद या केंद्राना १० महिने प्रमाणे प्रशिक्षण कालावधी देण्यात आला आहे. सदर योजना सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे.

**२) नागरी सेवा (पूर्व) परिक्षा मार्गदर्शन केंद्र**:-

संघ लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणा-या स्पर्धा परिक्षांकरिता अल्पसंख्याक लोकसमूहातील निवडक १० होतकरू उमेदवारांना यशदा, पुणे यांच्यामार्फत प्रशिक्षण देण्यात येते.

**ब) मराठी भाषा फौंडेशन वर्ग :-**

स्पर्धा परीक्षांमध्ये अल्पसंख्याक उमदेवार मराठी भाषेमध्ये मागे पडतात. यासाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी भाषेवर प्रभुत्व प्राप्त व्हावे याकरिता व त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी अमराठी शाळेत शिकणाऱ्या ८ वी ९ वी आणि १० वी च्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत मराठी भाषेचे फौंडेशन वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या मराठी भाषा फौंडेशन वर्गाचे आयोजन अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये करण्यात येत आहे. सदर योजना संचालक, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालक पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे.

**क) कौमी एकता सप्ताह :-**

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार दरवर्षी दिनांक १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीत कौमी एकता सप्ताह साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने दि.२० नोव्हेंबर हा दिवस अल्पसंख्याक कल्याण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने आयोगामार्फत तरूण पिढीच्या मनात राष्ट्रीय एकात्मता व बंधुभाव वृध्दिंगत करण्यासाठी आंतर शालेय निबंधलेखन, चित्रकला स्पर्धा व आंतर महाविद्यालयीन वादविवाद व नाटयस्पर्धा आयोजित करण्यात येतात.

**ड) अल्पसंख्याक हक्क दिन :-**

संयुक्त राष्ट्र संघटनेने दिनांक १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्र, धार्मिक, भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांसंबंधी केलेल्या घोषणेनुसार दरवर्षी १८ डिसेंबर हा दिन अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. सदर दिवशी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगातर्फे चर्चासत्र, कार्यशाळा इ. कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

# २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५<br>Actuals 2024-25 | | | अर्थसंकल्प २०२५-२६<br>Budget Estimate 2025-26 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committe d | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग | १०१४१ | २१४६६ | ३१६०७ | १५०४३ | २०००० | ३५०४३ |
| | एकूण | १०१४१ | २१४६६ | ३१६०७ | १५०४३ | २०००० | ३५०४३ |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष | | | | | | |
| झेडई -०१, | २२३५A२५८<br>२२३५A २४९ | १०१४१ | २१४६६ | ३१६०७ | १५०४३ | २०००० | ३५०४३ |
| | **एकूण** | **१०१४१** | **२१४६६** | **३१६०७** | **१५०४३** | **२००००** | **३५०४३** |

## ii) Financial Requirements

(रू. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६<br>Revised Estimates 2025-26 | | | अर्थसंकल्प २०२६-२७<br>Budget Estimate 2026-27 | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| १३२४८ | १६२०० | २९४४८ | १५२८९ | ३०००० | ४५२८९ | State Minorities Commission |
| | | | | | | B- Source of Finance |
| १३२४८ | १६२०० | २९४४८ | १५२८९ | ३०००० | ४५२८९ | ZE -०१,<br>Demand No. २२३५<br>Major Head<br>२२३५ A २५८<br>२२३५ A २४९ |
| **१३२४८** | **१६२००** | **२९४४८** | **१५२८९** | **३००००** | **४५२८९** | **Total** |

## ३) कर्मचारी वर्गाचा सारांश

**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग**

**राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी .**

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतन संरचना | वेतनस्तर | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ |
| | **राजपत्रित, वर्ग-१** | | | | |
| १ | सचिव | १ | १४४२०-२१८२०० | | ७६०० |
| २ | अवर सचिव | १ | १५६००-३९१०० | | ६६०० |
| | **अराजपत्रित, वर्ग-३** | | | | |
| ३ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १ | ९३००-३४८०० | | ४,४०० |
| ४ | रोखपाल -नि-उपलेखापाल | १ | ९३००-३४८०० | | ४३०० |
| ५ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | १ | ९३००-३४८०० | | ४३०० |
| ६ | सहायक | २ | ९३००-३४८०० | | ४३०० |
| ७ | लिपिक-टंकलेखक | २ | ५२००-२०२०० | | १९०० |
| ८ | वाहनचालक | २ | ५२००-२०२०० | | १९०० |
| ९ | शिपाई | ३ | ४४४०-७४४० | | १३०० |
| | **एकूण बेरीज** | **१४** | | | |

# कार्यक्रम क्रमांक (५)

## महाराष्ट्र राज्य हज समिती

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि. २५.०४. १९९० अन्वये महाराष्ट्र राज्य हज समितीची स्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य हज समिती ही सल्लागार स्वरुपाची संस्था असून ती केंद्रीय हज समिती, मुंबई व राज्यातील हज यात्रेकरु यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम करते. समितीची प्रमुख कार्ये पुढील प्रमाणे आहेत:-

१) इच्छूक यात्रेकरूंना उपयुक्त ठरू शकेल अशी माहिती गोळा करून ती यात्रेकरुंना पुरविणे.

२) इच्छूक यात्रेकरूंकडून अर्ज मागविणे व सोडत पध्दतीने चिठ्ठया टाकून यात्रेकरुंची निवड करणे.

३) इच्छूक यात्रेकरूंना सर्व बाबतीत सल्ला व मदत पुरविणे. उदा. आगाऊ लसटोचणी, वैद्यकीय तपासणी इत्यादी तसेच यासंदर्भात संबंधित स्थानिक प्राधिकरणाशी सहाकार्य करणे.

४) खादीमुल हुज्जाजची निवड करणे.

५) यात्रेकरूंना प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रेल्वे व राज्य परिवहन प्राधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक वाटाघाटी करणे.

केंद्रिय हज समिती अधिनियम, २००२ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने दि.१९/१२/२०२२ व दि.१९.०१.२०२३ च्या अधिसूचनेद्वारे नव्याने राज्य हज समिती गठीत करण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्य हज समितीचे कार्यालयीन कामकाज सांभाळण्याकरिता एकूण ११ अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर करण्यात आली आहेत.

हज यात्रेस जाणाऱ्या यात्रेकरुंसाठी आवश्यक प्रशिक्षण शिबीर आणि वैद्यकीय शिबीरांचे त्या त्या जिल्हयाच्या ठिकाणी आयोजनाचे काम महाराष्ट्र राज्य हज समितीमार्फत केले जाते.

**नागपूर हज हाऊस** :- दरवर्षी राज्यातून सुमारे १४ ते १५ हजार यात्रेकरु हज यात्रेकरिता प्रयाण करतात. केंद्र शासनाने मुंबई व नागपूर सह औरंगाबाद येथूनही हज यात्रेकरिता प्रयाणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. नागपूर येथून हज यात्रेकरिता प्रयाण करणा-या यात्रेकरुंच्या सुविधेसाठी नागपूर येथे हज हाऊस उभारण्यात आले आहे.

**औरंगाबाद हज हाऊस** :- औरंगाबाद येथून हज यात्रेकरिता प्रयाण करणा-या यात्रेकरुंच्या सुविधेसाठी औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्यात आले आहे.

## ३) कर्मचारी वर्गाचा सारांश

### महाराष्ट्र राज्य हज समिती

**महाराष्ट्र राज्य हज समितीच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी.**

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| **अ) महाराष्ट्र  राज्य हज समिती , मुंबई.** | | | | |
| **राजपत्रित, वर्ग-२** | | | | |
| १ | कक्ष अधिकारी | १ | ९३००-३४८०० | ४४०० |
| २ | लेखा अधिकारी | १ | ९३००-३४८०० | ४४०० |
| **अराजपत्रित,  वर्ग-३** | | | | |
| ३ | सहायक | २ | ९३००-३४८०० | ४३०० |
| ४ | लघुलेखक | १ | ९३००-३४८०० | ४३०० |
| ५ | लघु-टंकलेखक | १ | ५२००-२०२०० | २४०० |
| ६ | लिपिक-टंकलेखक | १ | ५२००-२०२०० | १९०० |
| ७ | लेखा लिपिक | १ | ५२००-२०२०० | १९०० |
| **वर्ग-४** | | | | |
| ८ | शिपाई | १ | ४४००-७४४० | १३०० |
| **ब) महाराष्ट्र राज्य हज समितीचे नागपूर विभागीय कार्यालय** | | | | |
| **राजपत्रित, वर्ग-२** | | | | |
| ९ | उप कार्यकारी अधिकारी | १ | ९३००-३४८०० | ४४०० |
| **अराजपत्रित,  वर्ग-३** | | | | |
| १० | वरिष्ठ लिपिक | १ | ५२००-२०२०० | २४०० |
| | **एकूण** | ११ | | |

# तक्ता - २

# Table - २

## २) वित्तीय आवश्यकता

## ii) Financial Requirement

# २) वित्तीय आवश्यकता

(रू.हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals 2024-25 | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate 2025-26 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | महाराष्ट्र राज्य हज समिती (२२३५ A २७६) | ० | ० | ० | ० | २०००० | २०००० |
| २ | हज यात्रेकरिता खर्च (२२३५ A २६७) | ७३५३ | ० | ७३५३ | २२८९४ | ० | २२८९४ |
| | **एकूण** | **७३५३** | **०** | **७३५३** | **२२८९४** | **२००००** | **४२८९४** |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष २२३५ | | | | | | |
| झेडई-०१ , | २२३५ A २६७ २२३५ A २७६ | ७३५३ | ० | ७३५३ | २२८९४ | २०००० | ४२८९४ |
| | **एकूण** | **७३५३** | **०** | **७३५३** | **२२८९४** | **२००००** | **४२८९४** |

## ii) Financial Requirements

(रू.हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate २०२६-२७ | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| ० | १४००० | १४००० | ० | ५०००० | ५०००० | Maharashtra State Haj Committee |
| ४२६२३ | ० | ४२६२३ | २३४९० | ० | २३४९० | Pilgrimage Charges |
| **४२६२३** | **१४०००** | **५६६२३** | **२३४९०** | **५००००** | **७३४९०** | **Total** |
| | | | | | | B- Source of Finance |
| | | | | | | Demand No. Major Head |
| ४२६२३ | १४००० | ५६६२३ | २३४९० | ५०००० | ७३४९० | ZE - ०१ , २२३५ A २६७ २२३५ A २७६ |
| **४२६२३** | **१४०००** | **५६६२३** | **२३४९०** | **५००००** | **७३४९०** | **Total** |

## कार्यक्रम क्रमांक (६)
## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर.

केंद्र शासनाने मुस्लिम धर्मियांच्या सार्वजनिक / वक्फ मालमत्तेंच्या रक्षणासाठी तयार केलेला वक्फ अधिनियम, १९९५ महाराष्ट्र राज्यात दिनांक १ जानेवारी,१९९६ पासून लागू केला आहे. शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. वक्फ १०/२००१/प्र.क्र.१५४/ल-३, दि.०४/०१/२००२ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,औरंगाबाद या नावाने स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे. दि.२१/०२/२००८ रोजी अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना झाल्यानंतर सदर विषय अल्पसंख्याक विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला. सध्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात ३३ कर्मचारी कार्यरत असून दि.२४/०२/२०२२ अन्वये सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आली असून त्यान्वये एकूण १७९ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

वक्फ मंडळावरील सदस्यांच्या नेमणूका शासन स्तरावर करण्यात येतात. उम्मीद अधिनियम, १९९५ च्या कलम १४ मधील तरतूदीनुसार विविध संवर्गामध्ये मंडळावर ११ सदस्यांची नियुक्ती करता येते. उम्मीद अधिनियम, १९९५ अंतर्गत खाली नमूद संवर्गातील सदस्यांची नियुक्ती नामनिर्देशनाने करता येते :-

१) कलम १४(अ) अध्यक्ष

२) कलम १४(१)(ब)(i) संसेदेचे राज्यातील किंवा प्रकरण परत्वे दिल्ली केंद्र शासित प्रदेशातील सदस्य-१

३) कलम १४(१)(ब)(ii) राज्य विधानमंडळाचे सदस्य-१

४) कलम १४(१)(क)(i) रुपये एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या वक्फ संस्थेचे मुतवल्ली-१

५) कलम १४(१)(क)(ii) इस्लामी शास्त्रातील मान्यताप्राप्त विद्याव्यासंगी-१

६) कलम १४(१)(क)(ii) नगरपालिका/ ग्रामपंचायत सदस्य (२ किंवा अधिक पदे)

७) कलम १४(१)(ड) सामाजिक कार्य, व्यवसाय व्यवस्थापन, सामाजिक कार्य, वित्त किंवा महसूल, कृषी आणि विकासात्मक क्षेत्रातील व्यक्ती-२

८) कलम १४(१)(इ) वक्फ विषयाची हाताळणी करणारा शासनाचा सहसचिव दर्जाचा अधिकारी-१

९) कलम १४(१)(फ) बार कौन्सिल सदस्य-१

## महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर

१) केंद्र शासनाने मुस्लिम धर्मियांच्या सार्वजनिक/वक्फ मालमत्तेच्या रक्षणासाठी वक्फ अधिनियम, १९९५ राज्यात दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून अंमलात आणलेला आहे. त्या अधिनियमाखाली येणाऱ्या प्रश्न वाद-विवादाच्या निरसनासाठी निर्णय घेण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण स्थापन केले.

२) वक्फ (सुधारणा) अधिनियम २०१३ (२०१३ चे २७ वे) अन्वये वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असून, कलम ८३ च्या पोट कलम (४) मधील सुधारीत तरतूदींनुसार त्रिसदस्यीय वक्फ न्यायाधिकरणाची स्थापना करणे आवश्यक असल्याने दि. १ ऑगस्ट, २०१७ च्या शासन अधिसूचने अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधीकरण, छत्रपती संभाजीनगर ची स्थापना करण्यात आलेली आहे.

३) उम्मीद अधिनियमातील सुधारित तरतूदीनुार वक्फ अनुषंगाने येणाऱ्या वादासाठी अध्यक्ष म्हणून "जिल्हा सत्र किंवा दिवणी न्यायाधीश, वर्ग-१ चा न्यायालयीन अधिकारी" तसेच "राज्य शासनातील कार्यरत किंवा सेवानिवृत्त अधिकारी" आणि "मुस्लीम कायदा व विधितत्वमीमांसाचे ज्ञान असणारी व्यक्ती" या संवर्गातील दोन सदस्य तसेच या व्यतिरिक्त न्यायाधिकरणाचे निरंतर कामासाठी ३४ कर्मचारी वृंदाची निर्मिती करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी**

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | वेतनस्तर |
|---|---|---|---|---|
| **गट - अ -राजपत्रित** | | | | |
| १ | अध्यक्ष | १ | संवर्ग पद | |
| २ | सदस्य (राज्य शासनातील सहसचिव दर्जाचा कार्यरत किंवा सेवानिवृत्त अधिकारी) | १ | संवर्ग पद | |
| ३ | सदस्य (मुस्लीम कायद्याचे ज्ञान व आकलन असलेली व्यक्ती) | १ | संवर्ग पद | |
| ४ | प्रबंधक | १ | ५६१००-१७७५०० | एस-२० |
| ५ | अधीक्षक | १ | ४४९००-१४२४०० | एस-१६ |
| **गट - ब** | | | | |
| ६ | सहायक अधिक्षक | २ | ४१८००-१३२३०० | एस-१५ |
| ७ | सहायक लेखाधिकारी | १ | ४१८००-१३२३०० | एस-१५ |
| गट - ब - अराजपत्रीत | | | | |
| ८ | लघुलेखक (निम्नश्रेणी ) | ३ | ३८६००-१२२८०० | एस-१४ |
| **गट - क** | | | | |
| ९ | वरिष्ठ लिपिक | ५ | २५५००-८११०० | एस-८ |
| १० | लेखापाल (लिपिक) | १ | २५५००-८११०० | एस-८ |
| ११ | लिपिक-टंकलेखक | ९ | १९९००-६३२०० | एस-६ |
| १२ | वाहन चालक | ३ | १९९००-६३२०० | एस-६ |
| १३ | बेलीफ | १ | १९९००-६३२०० | एस-६ |
| **गट - ड** | | | | |
| १४ | शिपाई | ४ | १५०००-४७६०० | एस-१ |
| | **एकूण** | **३४** | | |

**बाहययंत्रणेव्दारे:**

| अ. क्र. | सेवा | मनुष्यबळ |
|---|---|---|
| १ | वाहनचालक | २ |
| २ | शिपाई | २ |
| बाहययंत्रणेव्दारे एकूण मनुष्यबळ | | ४ |

## २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals 2024-25 | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate 2025-26 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमा वरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमा वरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ (२२३५ १२६७) | ३२३ | ० | ३२३ | २८२० | ० | २८२० |
| २ | महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण (२०५३-१२५८) | १५६६३ | ० | १५६६३ | ३९०७३ | ० | ३९०७३ |
| ३ | महाराष्ट्र वक्फ मंडळाला सहायक अनुदान (२२३५ A७४१) | ० | २००००० | २००००० | ० | १२०००० | १२०००० |
| | **एकूण** | **१५९८६** | **२०००००** | **२१५९८६** | **४१८९३** | **१२००००** | **१६१८९३** |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष | | | | | | |
| **झेडई-०१,** | **२२३५ A ७४१ २०५३ १२५८** | १५९८६ | २००००० | २१५९८६ | ४१८९३ | १२०००० | १६१८९३ |
| | **एकूण** | **१५९८६** | **२०००००** | **२१५९८६** | **४१८९३** | **१२००००** | **१६१८९३** |

## ii) Financial Requirements

(रू. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates 2025-26 | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate 2026-27 | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमा वरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| २५९२ | ० | २५९२ | २९८४ | ० | २९८४ | **Maharashtra State Waqf Board २०५३ १२६७** |
| ३५९४२ | ० | ३५९४२ | ४०४४२ | ० | ४०४४२ | **Maharashtra State Waqf Tribunal २०५३ १२५८** |
| ० | ८४००० | ८४००० | ० | १५०००० | १५०००० | **Maharashtra State Waqf Board २२३५A७४१** |
| **३८५३४** | **८४०००** | **१२२५३४** | **४३४२६** | **१५००००** | **१९३४२६** | **Total** |
| | | | | | | **B- Source of Finance** |
| | | | | | | **Demand No. Major Head** |
| ३८५३४ | ८४००० | १२२५३४ | ४३४२६ | १५०००० | १९३४२६ | **ZE — ०१, २०५३ १२५८ २०५३ १२६७ २२३५A७४१** |
| **३८५३४** | **८४०००** | **१२२५३४** | **४३४२६** | **१५००००** | **१९३४२६** | **Total** |

## कार्यक्रम क्रमांक -७

## महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी

महाराष्ट्रामध्ये उर्दू भाषेची वाङ्मयीन प्रगती व्हावी या दृष्टीने तसेच उर्दू आणि मराठी लेखक व कवी यांच्यात वैचारीक देवाण-घेवाण व्हावी व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी हया उद्येशाने सन १९७५ मध्ये महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीमार्फत उर्दू भाषेच्या वाङ्मयीन विकासासाठी पुढील प्रमाणे योजना राबविण्यात येतात:-

१) उर्दू भाषेचा प्रसार व प्रचार करणे.

२) इम्कान या त्रैमासिकाचे प्रकाशन.

३) राज्य व जिल्हास्तरावर चर्चासत्रे.

४) उर्दू महेफिले, मुशायरा इत्यादींचे आयोजन करणे.

५) उर्दू शाळा व महाविद्यालयांना वाङ्मयीन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सहाय्यक अनुदान मंजूर करणे.

६) उर्दू ग्रंथालयांना व ज्या ग्रंथालयांमध्ये उर्दू भाषेची पुस्तके ठेवण्यात येतात अशा ग्रंथालयांना नियतकालिके व पुस्तिकांच्या स्वरूपात सहाय्यक अनुदान मंजूर करणे.

७) उर्दू नाटय/ एकांकिका महोत्सव आयोजित करणे,

८) नाटय कार्यशाळेचे आयोजन करणे,

९) नाटय एकांकिका लेखकास उत्तेजन देण्याचे दृष्टीने लेखकांना पारितोषिके देणे.

१०) उर्दू पुस्तकांना तसेच मराठी -उर्दू अनुवादनाच्या पुस्तकांना प्रकाशनासाठी आर्थिक मदत करणे.

११) उर्दू पुस्तकांसाठी पारितोषिके देणे.

१२) १० वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर परीक्षांमध्ये उर्दू विषयात तसेच उर्दू माध्यमात पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देणे.

१३) शासन मान्यताप्राप्त उर्दु ग्रंथालयांना तसेच सर्वसाधारण स्वरूपाच्या ज्या शासन मान्य ग्रंथालयांमध्ये उर्दु शाखा अस्तित्वात आाहेत, अशा ग्रंथालयांना उर्दु पुस्तके/नियतकालिके उपलब्ध करून देणे.

१४) उर्दू पत्रकारांसाठी दरवर्षी कार्यशाळेचे आयोजन करणे.

१५) उर्दू भाषा शिकण्याची इच्छा असणाऱ्या लोकांसाठी उर्दू वर्ग सुरू करणे.

****************

## तक्ता - २

## Table - २

## २) वित्तीय आवश्यकता

## ii) Financial Requirement

## २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमी २२३५ B०९४ | ० | २०६२५ | २०६२५ | ० | २०००० | २०००० |
| २ | महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमी २२०५ ३०२७, | ३१२ | ० | ३१२ | १९६० | ० | १९६० |
| ३ | उर्दू घर २२३५ A ५५२ | ० | ५५६५३ | ५५६५३ | ० | ४०००० | ४०००० |
| | **एकूण** | **३१२** | **७६२७८** | **७६५९०** | **१९६०** | **६००००** | **६१९६०** |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष | | | | | | |
| झेडई -०१, | **२२०५ B ९४, २२०५ ३०२७, २२३५ A ५५२** | ३१२ | ७६२७८ | ७६५९० | १९६० | ६०००० | ६१९६० |
| | **एकूण** | **३१२** | **७६२७८** | **७६५९०** | **१९६०** | **६००००** | **६१९६०** |

| सुधारित अंदाज २०२५-२६<br>Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७<br>Budget Estimate २०२६-२७ | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | **A- Activity Classification** |
| ० | १४००० | १४००० | ० | २०००० | २०००० | **Maharashtra State Urdu Academy २२३५ B ०९४** |
| ६४६० | ० | ६४६० | १९६० | ० | १९६० | **Establishmant of Urdu Academy 22053027** |
| ० | २८००० | २८००० | ० | ४०००० | ४०००० | **Urdu Ghar २२३५ A ५५२** |
| **६४६०** | **४२०००** | **४८४६०** | **१९६०** | **६००००** | **६१९६०** | **Total** |
| | | | | | | **B- Source of Finance** |
| | | | | | | **Demand No. Major Head** |
| ६४६० | ४२००० | ४८४६० | १९६० | ६०००० | ६१९६० | **ZE – 01**<br>2205 B094,<br>2205 3027,<br>2235 A552 |
| **६४६०** | **४२०००** | **४८४६०** | **१९६०** | **६००००** | **६१९६०** | **Total** |

# कार्यक्रम क्रमांक (७)

## महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी,मुंबई

राज्यामध्ये पंजाबी भाषेचा विकास,भाषेचे संवर्धन, प्रगती तसेच पंजाबी व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारिक आदान प्रदान होवून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.पंसाअ-२०१७/प्र.क्र.१७६/का-४,दि.०५/१०/२०१८ अन्वये महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना खालीलप्रमाणे आहेत:-

१. पंजाबी भाषेतील पुस्तके महाराष्ट्रात प्रकाशनासाठी अनुदान योजना.
२. पंजाबी भाषेतील कवी/लेखक/विचारवंत यांच्या महाराष्ट्रात प्रसिध्द होणाऱ्या पुस्तकांना पारितोषिके देणे.
३. ग्रंथालयांना पंजाबी भाषेतील नियतकालीके व पुस्तके पुरविणे.
४. पंजाबी भाषेतील वाङमयीन व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन.
५. पंजाबी भाषेतील कार्यशाळा,परिसंवाद इ.चे आयोजन.
६. पंजाबी मेळाव्याचे आयोजन करणे.
७. पंजाबी भाषेतील उल्लेखनिय कामगिरीबद्दल पारितोषिके प्रदान करणेबाबत.
   - अ) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी जीवन गौरव पुरस्कार.
   - आ) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी पुरस्कार.
   - इ) नवोदित पंजाबी साहित्यिक पुरस्कार.
   - ई) पंजाबी पत्रकारिता पुरस्कार.
   - उ) शिक्षण सेवा पुरस्कार.
   - ऊ) विशेष पुरस्कार.

# तक्ता - २

# Table - २

## २) वित्तीय आवश्यकता

## ii) Financial Requirement

## २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी २२०५ ३५९१ | ० | ० | ० | ११९० | ० | ११९० |
| २. | महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी २२३५ C २१४ | ० | ० | ० | ३०००० | ० | ३०००० |
| | एकूण | ० | ० | ० | ३११९० | ० | ३११९० |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष | | | | | | |
| झेडई -०१, | २२०५ ३५९१ २२३५ C २१४ | ० | ० | ० | ३११९० | ० | ३११९० |
| | **एकूण** | ० | ० | ० | ३११९० | ० | ३११९० |

## ii) Financial Requirements

(रू. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate २०२६-२७ | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| १००८ | ९५३५६४ | ९५४५७२ | १२६० | ३३००० | ३४२६० | Maharashtra State Panjabi Sahitya Academy |
| १००८ | ९५३५६४ | ९५४५७२ | १२६० | ३३००० | ३४२६० | Total |
| | | | | | | B- Source of Finance |
| | | | | | | Demand No. Major Head २२०५, २२३५ |
| १००८ | ९५३५६४ | ९५४५७२ | १२६० | ३३००० | ३४२६० | ZE - 01,<br>२२०५ ३५९१<br>२२३५ C २१४ |
| १००८ | ९५३५६४ | ९५४५७२ | १२६० | ३३००० | ३४२६० | Total |

# कार्यक्रम क्रमांक (९)

# अल्पसंख्याक आयुक्तालय

अल्पसंख्याक समुदायासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत/केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करणे, अल्पसंख्याक विकास विभागाच्या अखत्यारितील कार्यालयाशी समन्वय साधणे, अल्पसंख्याक समुदायाच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी इतर विभागाच्या अखत्यारितील कार्यालयांशी समन्वय साधणे, विभागाचे प्रमुख क्षेत्रिय कार्यालय या नात्याने राज्यस्तरावर काम करणे, मंत्रालयीन प्रशासकीय विभागास आवश्यकतेनुसार राज्यस्तरावरील माहितीचे संकलन करुन अहवाल सादर करणे, केंद्र शासनाच्या १५ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी होण्यासाठी सर्व विभागांशी समन्वय साधणे, अल्पसंख्याक समाजाच्या हितासाठी विविध विभाग व त्यांचे क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे आणि त्याबाबतची एकत्रित माहिती /अहवाल शासनास सादर करणे, अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्राप्त प्रस्तावांची पडताळणी करुन प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी विभागास पाठविणे, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थांची पाहणी करुन त्याचा तपासणी अहवाल शासनास सादर करणे, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थांनी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे अर्ज नाकारल्यास त्याची तपसणी करुन शासनास अहवाल पाठविणे, जिल्हा स्तरावरील अल्पसख्यांक कक्षाकडे पाठपुरावा करणे, योजनांचा लाभ राज्यातील सर्व अल्पसंख्याक समुदायापर्यंत पोहोचण्यासाठी उपाययोजना करणे, त्याचा लाभ होतो किंवा कसे यावर देखरेख ठेवणे, योजनांची निष्पत्ती, योजनांतील त्रृटी/सुधारणा इ. सूचविणे, शासन आदेशांची अंमलबजावणी, निधीचा विनियोग, योजना/सेवा याबाबतचे सर्व प्रस्ताव शासनास पाठविणे इत्यादी सर्व बाबींसाठी अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) व सदर जिल्हास्तरावरील अल्पसंख्याक कक्ष आणि विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालये यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम अल्पसंख्याक आयुक्तालयामार्फत होईल.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिपत्याखाली “अल्पसंख्याक आयुक्तालय” स्थापन करून आयुक्तालयाच्या आस्थापनेवर खालीलप्रमाणे ३६ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम व संवर्ग | सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | आयुक्त | संवर्ग पद | १ |
| २ | उप आयुक्त | S-२३:६७७००-२०८७०० | १ |
| ३ | कार्यकारी अभियंता | S-२३:६७७००-२०८७०० | १ |
| ४ | सहायक आयुक्त | S-२०:५६१००-१७७५०० | २ |
| ५ | अधीक्षक (विधी) | S-१७:४७६००-१५११०० | १ |
| ६ | अधीक्षक | S-१४:३८६००-१२२८०० | १ |
| ७ | सहायक अभियंता श्रेणी-२ | S-१५:४१८००-१३२३०० | २ |
| ८ | सहायक लेखा अधिकारी | S-१५:४१८००-१३२३०० | १ |
| ९ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | S-१६:४४९००-१४२४०० | १ |
| १० | लघुलेखक (निम्नश्रेणी) | S-१५:४१८००-१३२३०० | १ |
| ११ | सहायक संशोधन अधिकारी | S-१४:३८६००-१२२८०० | २ |
| १२ | वरिष्ठ लिपिक | S-८:२५५००-८११०० | ३ |
| १३ | लिपिक-टंकलेखक | S-६:१९९००-६३२०० | ६ |
| १४ | अधीक्षक (भूमि अभिलेख) | करार पद्धतीने /बाह्ययंत्रणेद्वारे/ कंत्राटी तत्वावर | १ |
| १४ | वाहनचालक | बाह्ययंत्रणेद्वारे/ कंत्राटी तत्वावर | ४ |
| १५ | शिपाई | बाह्ययंत्रणेद्वारे/ कंत्राटी तत्वावर | ८ |
| | | एकूण पदे | ३६ |

- **अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रुपये ३.५८८६ कोटी.**

## कार्यक्रम क्रमांक (१०)

# जिल्हा अल्पसंख्याक कक्ष

अल्पसंख्याकांसाठीच्या सर्व योजनांचा तळागाळातील अल्पसंख्याक समूदायास लाभ मिळवून देण्याचे उद्दीष्ट सफल होण्याकरिता योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली "अल्पसंख्याक कक्ष" निर्माण करुन सदर कक्षासाठी खालीलप्रमाणे एकूण ८५ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्यांची नावे | पदांची नावे | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | वरिष्ठ लिपिक | लिपिक-टंकलेखक | शिपाई (बाह्ययंत्रणेद्वारे/कंत्राटी पद्धतीने) | |
| १ | अकोला | १ | १ | १ | ३ |
| २ | अमरावती | १ | १ | १ | ३ |
| ३ | छत्रपती संभाजीनगर | १ | १ | १ | ३ |
| ४ | बुलढाणा | १ | १ | १ | ३ |
| 5 | हिंगोली | १ | १ | १ | ३ |
| 6 | जालना | १ | १ | १ | ३ |
| 7 | मुंबई | १ | १ | १ | ३ |
| 8 | मुंबई उपनगर | १ | १ | १ | ३ |
| 9 | नागपूर | १ | १ | १ | ३ |
| 10 | नांदेड | १ | १ | १ | ३ |
| 11 | परभणी | १ | १ | १ | ३ |
| 12 | ठाणे | १ | १ | १ | ३ |
| 13 | वाशिम | १ | १ | १ | ३ |
| 14 | पालघर | - | १ | १ | २ |
| 15 | रायगड | - | १ | १ | २ |
| 16 | रत्नागिरी | - | १ | १ | २ |
| 17 | सिंधुदूर्ग | - | १ | १ | २ |
| 18 | नाशिक | - | १ | १ | २ |
| 19 | पुणे | - | १ | १ | २ |
| २० | सातारा | - | १ | १ | २ |
| २१ | सांगली | - | १ | १ | २ |
| २२ | सोलापूर | - | १ | १ | २ |
| २३ | अहमदनगर | - | १ | १ | २ |
| २४ | नंदूरबार | - | १ | १ | २ |
| २५ | धुळे | - | १ | १ | २ |
| २६ | जळगाव | - | १ | १ | २ |
| २७ | लातूर | - | १ | १ | २ |
| २८ | धाराशिव | - | १ | १ | २ |
| २९ | वर्धा | - | १ | १ | २ |
| ३० | यवतमाळ | - | १ | १ | २ |
| ३१ | भंडारा | - | १ | १ | २ |
| ३२ | गोंदिया | - | १ | १ | २ |
| ३३ | गडचिरोली | - | १ | १ | २ |
| ३४ | चंद्रपूर | - | १ | १ | २ |
| ३५ | कोल्हापूर | - | १ | १ | २ |
| ३६ | बीड | - | १ | १ | २ |
| | | | | **एकूण** | **८५** |

- **अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रुपये ५.२८३८ कोटी.**

## कार्यक्रम क्रमांक (११)

# अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षणा संस्था (MRTI)

महाराष्ट्र राज्यामध्ये मुस्लिम, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, ज्यु, सिख व पारशी हे धार्मिक अल्पसंख्याक समुदाय आहेत. अल्पसंख्याक समुदायातील घटकांसाठी केंद्र शासन तसेच राज्य शासनामार्फत विविध शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या विविध योजना राबविण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना इत्यादी योजना राबविण्यात येतात.

अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उन्नती होण्यासाठी राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती या स्वायत्त संस्थांच्या धर्तीवर संस्था स्थापन करणेबाबत मागणी होत होती. त्या अनुषंगाने राज्यातील अल्पसंख्याक समुदायाच्या, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाशी संबंधित समस्यांचा अभ्यास करणे आणि शासनास त्यावरील उपाययोजना सुचवून त्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे, याकरिता बार्टी, सारथी, महाज्योती या सारख्या संस्थांच्या धर्तीवर अल्पसंख्याक समुदायासाठी या विभागाच्या अधिपत्याखाली “अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)” या स्वतंत्र स्वायत्त संस्थेची दि.२२ ऑगस्ट, २०२४ अन्वये स्थापना करण्यात आलेली आहे.

४. “अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI)” या स्वतंत्र स्वायत्त संस्थेची स्थापना करुन या कार्यालयाच्या आस्थापनेवर उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेस अधीन राहून खालील प्रमाणे ११ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | संचालक | एस-२५:७८८००-२०९२०० | १ |
| २ | प्राध्यापक | एस-२३:६७७००-२०८७०० | १ |
| ३ | प्रकल्प अधिकारी (श्रेणी २) | एस-२०:५६१००-१७७५०० | १ |
| ४ | सहायक प्राध्यापक | एस-१८:४९१००-१५५८०० | १ |
| ५ | उच्चश्रेणी लघुलेखक | एस-१६:४४९००-१४२४०० | १ |
| ६ | सहायक संशोधन अधिकरी | एस-१४:३८६००-१२२८०० | १ |
| ७ | वरीष्ठ लिपिक | एस-८:२५५००-८११०० | १ |
| ८ | लिपिक-टंकलेखक | एस-६:१९९००-६३२०० | १ |
| ९ | वाहनचालक | बाह्ययंत्रणेद्वारे/कंत्राटी तत्वावर | १ |
| १० | शिपाई | बाह्ययंत्रणेद्वारे/कंत्राटी तत्वावर | २ |
| **एकूण** | | | **११** |

- **अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०२६-२७):- रुपये ४.०० कोटी.**

## तक्ता - २

## Table - २

### २) वित्तीय आवश्यकता

### ii) Financial Requirement

## २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च Committed | कार्यक्रमावरील खर्च Scheme | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed | कार्यक्रमावरील खर्च Scheme | एकूण Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | अल्पसंख्याक आयुक्तालय २२२५ G०१८ | ० | ० | ० | ३३६८० | ० | ३३६८० |
| २. | अल्पसंख्याक कक्ष २२२५ G०२७ | ० | ० | ० | ४९६१६ | ० | ४९६१६ |
| ३. | अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (२२२५ G५५५) | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | ० | ० | ० | ८३२९६ | ० | ८३२९६ |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष २२२५ | | | | | | |
| झेडई -०१, | २२२५ G०१८ २२२५ G०२७ २२२५ G५५५ | ० | ० | ० | ८३२९६ | ० | ८३२९६ |
| | **एकूण** | ० | ० | ० | ८३२९६ | ० | ८३२९६ |

## ii) Financial Requirements

(रू. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate २०२६-२७ | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| २९४८५ | ० | २९४८५ | ३५८८६ | ० | ३५८८६ | Minority Commissionerate (२२२५ G०१८) |
| ४४३२३ | ० | ४४३२३ | ५२८३८ | ० | ५२८३८ | District Minority Cell (२२२५ G०२७) |
| ० | २३५३९ | २३५३९ | ० | ४०००० | ४०००० | Minority Research and Training Institute (२२२५ G५५५) |
| ७३८०८ | २३५३९ | ९७३४७ | ८८७२४ | ४०००० | १२८७२४ | Total |
| | | | | | | B- Source of Finance |
| | | | | | | Demand No. Major Head २२२५ |
| ७३८०८ | २३५३९ | ९७३४७ | ८८७२४ | ४०००० | १२८७२४ | ZE - 01, २२२५ G०१८ २२२५ G०२७ २२२५ G५५५ |
| ७३८०८ | २३५३९ | ९७३४७ | ८८७२४ | ४०००० | १२८७२४ | Total |

## कार्यक्रम क्रमांक (१२)

## संकीर्ण सर्वसाधारण सेवा

**प्रस्तावना :-**

**अ) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधानांचा नवीन १५ कलमी कार्यक्रम.**

अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता तत्कालिन मा. पंतप्रधान यांनी सन १९८३ मध्ये १५ कलमी कार्यक्रम जाहिर केला होता. दि.२५ फेब्रुवारी, २००५ रोजी संसदेच्या संयुक्त अधिवेशनास संबोधित करताना मा. राष्ट्रपती यांनी "शासन विशिष्ट बाबी लक्षात घेऊन अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी नव्याने १५ कलमी कार्यक्रम आखत आहे", अशी घोषणा केली होती. सन २००५ च्या स्वांतत्र्यदिनी मा. पंतप्रधानांनी देशाला उद्देशून दिलेल्या आपल्या संदेशात असे म्हटले होते की, "आम्ही अल्पसंख्याकासाठी सुधारित आणि प्रभावी १५ कलमी कार्यक्रम आखणार आहोत नव्या १५ कलमी कार्यक्रमाची निश्चित ध्येये ठराविक कालावधीत साध्य करण्यात येतील." याच वचनबध्दतेला अनुसरुन आधीचा कार्यक्रम संशोधित करुन अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मा.पंतप्रधानांचा नवीन १५ कलमी कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

मा. पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-

१. अल्पसंख्याकांकरिता शिक्षणांच्या संधीमध्ये वाढ करणे.

२. आर्थिक कार्यक्रम आणि रोजगारांमध्ये अल्पसंख्याकांकरिता समान वाटा उपलब्ध करुन देणे.

३. अल्पसंख्याकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे.

४. सांप्रदायिक दंगलीना आळा घालणे व त्यांचे नियत्रंण करणे.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार राज्यात मा.पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ ऑक्टोबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये संनियंत्रण समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. शासन निर्णय, दि.२९ एप्रिल, २०११ अन्वये जिल्हा अल्पसंख्याक विकास संनियंत्रण समित्यांची पुनर्रचना करण्यात आली होती व सध्या ३० जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा अल्पसंख्याक समित्यांची पुर्नरचना करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आली आहे.

तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनान्वये अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा.पंतप्रधानांचा नवीन १५ कलमी कार्यक्रमाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय संनियंत्रण समिती शासन निर्णय, दि.६ ऑक्टोबर, २००६ रोजी गठीत करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यस्तरीय संनियत्रंण समितीची पुनर्रचना दि. २७ जून, २००८ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली. या राज्यस्तरीय संनियत्रंण समितीवर पंचायतराज संस्थांचे जिल्हास्तरावरील प्रतिनिधी, अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्थांचे मान्यवर प्रतिनिधी आणि इतर प्रतिनिधी यांचाही सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा.पंतप्रधानाचा नवीन १५ कलमी कार्यक्रमाचा त्रैमासिक अहवाल नियमितपणे अल्पसंख्याक कार्य मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांना पाठविण्यात येतो. राज्य स्तरीय व जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची बैठक दर ३ महिन्यांनी आयोजित करण्यात येवून, या बैठकीत नवीन १५ कलमी कार्यक्रमाचा आढावा घेणे अपेक्षित आहे.

मा. पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमातील विविध कलमांना अनुसरुन राज्य शासनाने आतापर्यंत केलेल्या ठळक कार्यवाहीचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे:-

१. एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या सहयोगाने अल्पसंख्याक बहुल भागात अंगणवाडया कार्यान्वित आहेत.

२. अल्पसंख्याक बहुल जिल्हयातील परभणी, जालना आणि हिंगोली येथे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये सुरु करण्यात आली आहेत.

३. उर्दू शिकविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाच्या सहकार्याने उर्दू शिकविणाऱ्या शिक्षकांना खास प्रोत्साहन भत्ता दिला जात आहे.

४. मदरशांच्या आधुनिकीकरणाचे नविन प्रस्ताव अनुदानासाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत.

५. अल्पसंख्याक समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या

अ) प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना,

ब) पोस्ट-मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना,

क) गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती योजना,

ड) मोफत प्रशिक्षण व संबध्द योजना,

इत्यादी राज्य शासना मार्फत राबविण्यात येत आहेत.

६. स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना इ. योजना अल्पसंख्याकांपर्यंत पोहचविण्यासाठी खास प्रयत्न करण्यात येत आहेत.

७. अल्पसंख्याक बहुल भागात नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात येत आहेत.

८. अल्पसंख्याक समाजाचा शासकीय नोकऱ्यामधील सहभाग वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग पुढील उपक्रम राबवित आहे:-

अ) अल्पसंख्याक उमेदवारांसाठी शासकीय सेवा भरतीपूर्व प्रशिक्षण वर्ग ,

ब) पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण वर्ग,

क) मराठी भाषा प्रशिक्षण वर्ग,

९. अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांचा जीवन मानाचा दर्जा सुधारण्यासाठी ग्रामीण गृह बांधणी योजनेत व झोपडपट्टी विकास कार्यक्रमात अल्पसंख्याकांना प्राधान्य देण्यात येत आहे.

१०.जातीय व धार्मिक दंगलींना आळा घालण्यासाठी कुशल, निष्पक्ष, निरपेक्ष, पोलिस अधिकाऱ्यांची अल्पसंख्याक बहुल भागातील पोलिस स्टेशनमध्ये नेमणूक करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

## ब) राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/ भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जाची मान्यता.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३० (१) अन्वये धर्म व भाषा या निकषावर अल्पसंख्याक लोकसमुहाला आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापनेचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांना धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या कार्यपध्दतीत सुधारणा करून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्याबाबत **www.mdd.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस अर्ज उपलब्ध करून देऊन दिनांक १ जून २०१३ पासून अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबतचा सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील अलपसंख्यांकांकडून चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जाची मान्यता प्रदान करण्याकरीता **online** पध्दतीने अर्ज करण्यात येत आहेत. सदर शासन निर्णयान्वये शैक्षणिक संस्थांना धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जाची मान्यता प्रदान करण्यासाठी राज्य शासनाचे सह सचिव/ उपसचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ नुसार सदर सेवा अधिसूचित करण्यात आली व सेवेच्या कार्यपध्दतीत सुधारणा करून दि.०४ जुलै,२०१७ पासून https://aapalesarkar.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## क) महाराष्ट्र शासनाचा श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार

दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय एकात्मतेसाठी विशेष कार्य करणा-या व्यक्तींची व संस्थांची निवड करुन त्यांना राष्ट्रीय एकात्मता पारितोषिके प्रदान करण्याची राज्य शासनाची योजना आहे.

## २) वित्तीय आवश्यकता

(रू. हजारात / Rs. in thousands)

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | प्रत्यक्ष रकमा २०२४-२५ Actuals २०२४-२५ | | | अर्थसंकल्प २०२५-२६ Budget Estimate २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण |
| | | Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | कार्याचे वर्गीकरण | | | | | | |
| १ | श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पारितोषिके २०७५०६७९ | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | एकूण | ० | ० | ० | १ | ० | १ |
| ब | वित्तीय व्यवस्थेतील साधने | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष | | | | | | |
| झेडई- ०१ , | २०७५ | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | एकूण | ० | ० | ० | १ | ० | १ |

## ii) Financial Requirements

(रू. हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज २०२५-२६ Revised Estimates २०२५-२६ | | | अर्थसंकल्प २०२६-२७ Budget Estimate २०२६-२७ | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रमावरील खर्च | एकूण | |
| Committed | Scheme | Total | Committed | Scheme | Total | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | A- Activity Classification |
| १ | ० | १ | १ | ० | १ | Smt. Indira Gandhi National Integration Awards २०७५६७९ |
| १ | ० | १ | १ | ० | १ | **Total** |
| | ० | | | ० | | B- Source of Finance |
| १ | ० | १ | १ | ० | १ | ZE – 01, 2075 |
| १ | ० | १ | १ | ० | १ | Total |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.